वही क्र ०४

# कडकडाट आणि अन्य कविता

काव्य संग्रह

कविता : श्रीयुत रामचंद्र वामन पंतोजी एम ए (संस्कृत, AMU 1927) © संपर्क : अतुल पंतोजी email:atul.pantojee@gmail.com प्रथमावृत्ती:२०२६ (आषाढ शुक्ल पौर्णिमा १९४८ बुधवार, २९.०७.२०२६ )

## प्रस्तावना

सदर कृति श्रीयुत रामचंद्र वामन पंतोजी (जन्म: 1892, देवलोकगमन: 29 डिसेंबर 1973), एम ए (संस्कृत, AMU 1927) ह्यांचे उपलब्ध असलेल्या चार हस्तलिखित वह्यांचे तंतोतंत पुस्तकीकरणाचं प्रयत्न आहे. यांत संस्कृत आणि मराठी काव्य आहेत. रचनाकाराचे अल्प परिचय खालील प्रमाणे आहे.

ग्वाल्हेर राज्यात वास्तव्यास असलेल्या श्रीयुत वामनराव पंतोजी कुटुंबातील ते मधले अपत्य होते. पिढीजात शिक्षकी वृत्ति मध्ये स्वतःला गुंतवून, 30 वर्षे तत्कालीन ग्वाल्हेर राज्यतील ग्वाल्हेर, उज्जैन, मंदसौर व गुणा ह्या ठिकाणी ते शिक्षक आणि नंतर हेड मास्तर राहीले. वयाच्या पस्तीसाव्या वर्षी अलीगढ मुस्लिम यूनिवर्सिटी येथून प्रायेवट एम ए सुद्धा केले.

1942 पश्चात सेवानिवृत्ती नंतर शुजालपुरच्या मंडी समिती हाई स्कूल मध्ये मुख्य अध्यापक राहिले त्यानंतर उज्जैन येथील उद्योजक श्रीमान लालचंद सेठी यांच्या आग्रहास्तव 1947 ते 1973 पर्यन्त इंदूर येथे त्यांचे नगरश्रेष्ठी बंधु श्री भंवरलाल सेठी (मेसर्स बिनोदीराम बालचंद, बँकर्स अँड ट्रेजरर बॉम्बे बडोदा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे) यांच्या कुटुंबास शिकविण्यासाठी ट्युटर गार्डियन होते. सदर कृति साधारणपणे १९२८-१९३५ च्या काळात लिहीली गेली आहे.

## प्राक्- कथन

वही क्रमांक चार मध्ये ५९ कवितांचे संग्रह आहे. अन्य काव्य रचना प्रमाणे काही कविता वेगवेगळ्या संमेलनांसाठी आणि समरोपां साठी केल्या आहेत. घरगुती प्रसंगावर बरेचसे काव्य आहेत. राजाश्रयी असल्यामुळे प्रासंगिक काव्य सुद्धा ह्यात आहेत. तत्कालीन राजकीय घडामोडी वर काही सुचलेल्या कविता पण आहेत.

- घरगुती कौटुंबिक प्रसंगांवरील गंमत माण्डणारे काव्य " कडकडाट " ह्या कवितेत आहे. हे या संग्रहाचे शीर्षक आहे.

- विशेष ह्या काव्य संग्रहतील अर्ज (1) आणि अर्ज (2) ह्या कविता ,त्याकाळी वापरत असलेल्या सरकारी दफ्तरी फारसी युक्त मराठीतील निवेदने आहेत.
- विलियम वर्डसवर्थ ची "वसन्तागमन पूर्वी लिहिलेल्या ओळी" (Lines written in early spring ) कविता मराठी रुपान्तर केली आहे. कदाचित त्या काळी पाठ्यक्रमात शिकवली जात असावी.

- ह्या पूर्वी तीन पुस्तकाकार काव्यांचे प्रकाशन झालेले आहे . त्यांचे शीर्षक खालील प्रमाणे आहेत .
    1. " रंगवीन वैखरीस, वरद हस्त हा शिरीं" आणि अन्य कविता (९६ कविता)
    2. " कां ना आला बाल राजा आणि अन्य कविता" दिलेले आहे. (७० कविता)
    3. मेरू च्या शिखरी चढेन अथवा चलेंन पाण्यावरी आणि अन्य कविता(७७ कविता )
    4. कडकडाट शीर्षक असलेले प्रस्तुत काव्य पुष्प (५९ कविता )हे ह्या श्रृंखलेत शेवटले काव्य संग्रह आहे.

ह्या वरील चार संग्रहात एकूण ३०२ काव्य रचना आहेत.

- ह्या नंतर श्री गोस्वामी तुलसीदास कृत रामायणातील सुंदरकांडचे मराठी रूपान्तर शेष आहे ते ह्या नवरात्रि पर्यन्त संपादित करण्याचे योजिले आहे.

- हस्तलिखित अनुक्रमणिका सोबत सुरुवातीला एक वेगळी अनुक्रमणिका (table of content ) quick hyperlink (क्विक हायपरलिंक ) युक्त दिली आहे. त्यावर क्लिक करून त्या कंटेंट वर सत्वर जाऊन वाचता येईल.
- कोष्टकांत खाडाखोड किंवा अस्पष्ट असलेल्या नोंदी आहेत. काही चुका असणे शक्य आहे, त्या अवश्य सूचित करा. त्यावर योग्य ते सोपस्कार करता येतील.
- हुबेहूब वही मध्ये असल्या प्रमाणे पुस्तक केले आहे.

- संपादक

# Table of Contents

अनुक्रमणिका.....5
कडकडाट.....8
'ऐकून हे चकित होय लहान बाळ '.....9
आव्हान (हांक).....10
 दर्शन.....10
 कट.....11
गणेश प्रार्थना.....12
उत्तर.....14
 समस्यापूर्ति.....15
'आई मला लालु ग दे न थोला(/थोड़ा)! '.....15
महात्म्याचें तप.....18
आई मला आई मला लालु दे ग न थोला(ड़ा).....20
 रसानन्द.....22
 फेरिवाला.....23
 पहाडी भारतीय वीर.....24
जा सारखा खणत खोल गभीर खाण.....26
तेजस्व्यास.....27
(एकामेका) पाठच्या बहिणी.....29
 लिहून खोड़लेलं.....30
प्रभात प्रणय.....30
रात्रीं दहाला सुरू कोर्ट झाले.....32
पांढरा केस.....34
 काय नापिका केश कलापा दावि मला तू कला.....36
विजली न चिता अजून ही.....37
पितृ वियोग.....39
आराम खुर्ची वर ती बसून.....42
दिंडी: 'मिठी लवकल तूं माल माला ताई(/आई/माई)|.....45

अर्ज़ (१)....................................................................................................46
गुलाल........................................................................................................48
अर्ज़ (२)....................................................................................................50
(आईने एक नवीन लुगडे घेतल्यानंतर तिन्ही मुलींची उत्सुकता)...............................51
सारे द्रव्य दिलें नृपा चुकवीला गेला न सारा जरी ।..................................................52
मध विकणारी...........................................................................................56
बाल - वेली..............................................................................................57
वंङ्ग - अङ्गने (पुंगीवाली)................................................................................58
Lines Written in Early Spring BY William Wordsworth (1770-1850)..60
वसन्तागमानापूर्वी लिहिलिल्या ओळी...................................................................60
त्रिशिंग राव..................................................................................................62
गरिबाची कावड..........................................................................................62
सोड मार्ग सोड च बाळे..................................................................................64
रडवितो बघ मी तुज ताइ ग..............................................................................65
काय झोपणे गडे..........................................................................................66
प्रगटली नुकती जगतीं कळी.............................................................................67
झाला चित्तीं भ्रम मधुनि कीं बाळ हे होय जागे......................................................69
दुडु दुडु दुडु दुडु इन्दु आली........................................................................ 71
साभार स्वीकृती.......................................................................................... 73
(हात)रूमाल.............................................................................................. 75
साऱ्या सुकुमार मुली......................................................................................77
प्रभात.......................................................................................................78
नाना आणि मनी...........................................................................................85
मधुमक्षिका.................................................................................................87
सुनीत :देतां द्या निधी, हा परंतु फुटका माझा असे हा घट........................................88
पहिलं वाहिलं कार्य आपलं..............................................................................89
कालिया मर्दन..............................................................................................91
सूर्यग्रहण.................................................................................................. 93
पाठराखण.................................................................................................. 95

शारदा दर्शन २६ सप्टेंबर १९३३........96
मयूर वाहिनी........96
सदाफुली........99
आनंदाची वाट........100
रेझर पॉयझनिंग (धारदूषित वस्तरा)........102
नंदनवनिं चीं झाडें वेली........105
पाडवा (ड्राफ्ट)........108
पाडवा........111
ज्योती मालवे........114
बरं झालं, झालं लगीन ताईचं........116
आखरी अनुरोध........121
सूर्यग्रहण........122
आखरी अनुरोध........124

# कडकडाट आणि अन्य कविता

श्रीयुत रा वा पंतोजी

## वही क्रमांक ४

## अनुक्रमणिका

(index: existing pages # 35 on 94 to #57 on 167),add on-missing pages

legend/key to symbols used in index:
# =poem Sr. no.
(x)  = page no
§= not numbered
FULL BLANK PAGES
(22.),(34.),(42.),(44),(50.),(56.),(70.),(84.* SKIPPED),(88. to 91. skipped),(93.),(99. B),(99.),(104.),(109.),(110.),(121.),(129.), (135.),(139.),(153.),(161.),(164.),(175.),(176.),(177.),

#1. कडकडाट (1)
#2. ऐकून हें चकित होय लहान बाळ (3)
#3. आव्हान (हांक)  (4)
#4. दर्शन (5)
#5. कट (6)
#6. गणेश प्रार्थना (8)
#7. उत्तर (10)
#8. समस्यापूर्ति (आला जगतिं.....) (12)
#9. आई मला लालुं दे नां थोला.... (13) (08. 10. 1932)
#10. महात्म्याचं तप (06.10. 1932) (16) Dec 1932 च्या चित्रमय जगत मासिकांत प्रकाशित
#11. आई मला लाडु दे नं थोड़ा (बोबडे बोल) (18) 08.10. 1932 Revised
#12. रसानंद (20)
#13. फेरिवाला (23)
#14. पहाडी भारतीय वीर (25)

#15. जा सारखा खोदत खोल गभीर खाण (27)
#16. तेजस्व्यास (तेजस्वी माणसास उद्देश्यून) (29)
#17. पाठच्या बहिणी (31)
#18. Untitled initial draft ~~रात्री दहा ला सुरू कोर्ट झाले~~ (33)
#19. प्रभात प्रणय (35)
#20. Contd. रात्री दहाला सुरू कोर्ट झाले (37)
#21. पांढरा केस (16. 02. 1933) (40)
#22. काय नापिका केश कलापा दावि मला तू कला (न्हाव्यास उद्देश्यून) (43)
#23. Untitled विझली न चिता अजून ही (45)
#24. पितृ वियोग (51)
#25. Untitled आराम खुर्ची वर ती बसून वाचित असे पेपर (57)
#26. (दिण्डी) मिठी लवकर तू मार मला माई (बोबडे बोल) (63)
#27. अर्ज़ (1) (65)
#28. गुलाल (66)
#29. अर्ज़ (2) (69)
#30. आई ने एक नवीन लुगडं घेतल्यानंतर तिन्हीं मुलींची उत्सुकता (71)
#31. Untitled सारे द्रव्य दिलें नृपा..... (73)
#32. मध विकणारी (77)
#33. बाल वेली (78)
#34. पुंगीवाली - (वंग अंञन) (79)
#§. Untitled I heard a thousand blended notes.... (82)
#§. Untitled विश्रान्तिस बसें मनोहर लता..... (83)
#§. Untitled Contd from 82 (86)
#§. त्रिशिंगराव -One line incomplete (87)
#§. गरीबाची कावड (92)
#35. सोड मार्ग मम सोडच बाळे (94)
#36. कि ति हि तू कर यत्न न मी रडें (96)..
#37. हांक मारिलें! काय झोपणें गड़े (98)
#38. प्रगटली नुकतीं जगतीं कळी (99 A)
#39. झाला चित्तीं भ्रम मधुनि कीं बाळ हें होय जागें (100)
#40. दुडु दुडु दुडु दुडु इंदु आली (102)
#41. साभार स्वीकृति (प्या प्यां किती तरि न जो कधि ही रिकामा...) (105)

#42. हात रुमाल (मुद्दाम ती काढून काम काहीं) (106)
#43. साऱ्या सुकोमल मुली इतर (111)
#44. प्रभात (113)
#45. नाना आणि मनी (122)
#46. मधु मक्षिका (125)
#47. सुनीत (देता, द्या निधि, हा परंतु फुटका माझा असे हो घट) (127)
#48. पहिलं वहिलं कार्य आपलं (131)
#49. कालिया मर्दन (132)
#50. सूर्यग्रहण (136)
#51. पाठराखण (140)
#52. मयूर वाहिनी = शारदा दर्शन (141)
#§. सदाफुली (147)
#53. आनंदाची वाट (148)
#54. रेझर पायझनिंग (I50)
#55. नंदनवनिंची झाडें वेलीं (प्रास्ताविक) (154)
#56. पाडवा (162)
#§. ज्योति मालवे... (165)
#57. बलं झालं झालं लगिन ताईचं (167)

पृष्ठ क्रमांक १

# कडकडाट

(बाहेरून थकून भागून येऊन घरात पाऊल दिल्यानंतर नेहमी होत असलेल्या कडकडाटानें कोणते पतिराज नर्मावून भाषण करणार नाहीं!)

जिजाई, तूं चालू दे हं नेहमींची टकळी |
 कसें नच सूत आपल्यांत मुळीं !!||
 आनंदानें बसलो येथें येउनि पाटावरी|
 दोन घास मज घेउं दे तरी||
 हें आणा तुम्हिं तें आणा, मम घाबरवि ग प्राणा|
 मज जवळ न मुळिं एक हि आणा ||
पडला आहे दिवस मोकळा सुटुं दे तोफ पुढें |
मी खंबीर ग उभा तुज पुढें ||
नुकता बाहेरूनि मी आलो कितितरी गे दुरुनी|
डब डबलो घामानें थकुनि||
 गोड बोलणें बघणें हंसणें न तोंडीं लावाया |
गोड न वाटे मज जेवाया||
 खोल ममान्तरिं दूर अन्तरीं बॉम्ब तव वच फुटती|
 भिडती भिनती रुजती रुतती ||
पृष्ठ क्रमांक २
नयनांतुन तंव ठिणग्या पडती, सतत सुरू सरबत्ती|
 अलोट तव वाग्बल संपत्ति ||
चपला जिभली बिळांत जशि जणुं नागिणच वळवळते |
सकल शांति सुख विलया नेते ||
प्रभावशालिनी नदी स्वैरिणी वैरिणी खळखळते|
 मम हृदय तटावरिं धडधडते ||
मनोरथाचे उंच मनोरे ढांसळुनि गे पडती |

धन्य जिभली बिजलीची कृती !!!||

उठती वाफा संतापें तव क्षुब्ध हृदय- सागरीं|
पसरती ढग मम मनो भूवरी ||
ऐकुनिं सगळें कळवळली मग गृहिणी अप्रिय करणी |
अनूतापें पडली पतिचरणीं ||
'वाटे मजला गेला रुसूनी येतां कधि मग घरीं|
हळ -हळलें मी मनिं किती तरी ||
कसें करूं मी सांगा मजला' ज्यानें वाटे बरें |
इतकी निर्दय काय मी बरें||

पृष्ठ क्रमांक ३

हंसत हंसत तूं यावें येतां बाहेरूनि मी घरीं |
वर्षवी मधुर वचामृत बरी||
फुलातील वृत्ती कळया मनांतिल; असुं दे च प्रियकरणी|
अंतरिं प्रेम राग वरकरणी ||

---

# 'ऐकून हे चकित होय लहान बाळ '

इंदू पुसे' समयिं एक लहान बाला|
'तूं कां अशी बसशि दूर'?' 'विटाळ झाला' ||
टांग्यातुनी तुज बरोबर काय सांग |
आलें न मी ? मग विटाळ मला न का ग ! ||
काळी असे मदिय चंद्रकळा न कोरी|
तूं मर्म हें समजशील न आज पोरी ||
काळया जुन्याच लुगड्यास असे विटाळ|
ऐकून हें य चकित होय लहान बाळ||

---

पृष्ठ क्रमांक ४

# आव्हान (हांक)

जयति जयति जय वाङ्मय जननी| कवन -कुसुम तव अर्पित चरणीं |
मङ्गल करणी तू करुणा घन |
हृदय भूमीवरि वर्षवि जल कण||
मरूतल ही करि फुलवुन उपवन|
जन तव भजनीं रत दिन -रजनी ||१||
ज्ञानेशादिक धन्य तनय तव |
सांठविती हृदयीं पय अभिनव||
वांङ्मय गंगा जिथुनि निघुनि नव |
शीतलता पसरित तटिं तटिनी ||२||
धांवुनि लवकर येई आई|
स्नेहल नयनें उचलुनि घेई||
भूक लागली रामा पाही|
सोड धार तूं शिशुगण वदनीं||३||
पृष्ठ क्रमांक ५

# दर्शन

कोण रम्या वाङ्मयाच्या मंडपाच्या आंत आले|
दर्शना घेतां जयांच्या चित्त माझें शुद्ध झालें ||
दर्शनोत्कंठा मनाला लोचनाला लावणारे|
जाहिराती लागल्या 'येणार'; ते हो काय आले? ||
स्थान मालिन्यास नाहीं येथ यांच्या अंतरंगीं|
शारदापादाब्जरंगीं भृंगसे हे गुंगलेले ||
मंडळी ही मंडपाचीं, भूषणें रत्नें सुकांति |
उज्ज्वला नक्षत्र-पंक्ती पाहतां मन्नेत्र धाले ||

दाखवाया वाट,आल्या ज्योति, खालीं या नभाच्या|
चांदण्या देवीदयेच्या, प्रेममूर्तीमंत झालें||
अंधकारीं कंटकाच्या घोरमार्गीं चालणाऱ्यां |
श्रान्त पांथस्था असे हे भाग्य तूझे कीं उदेले ||
खोल चित्तीं गुप्त यांच्या स्रोत कल्याणी सुधेचे |
प्यावया पीयूषधारा कान माझे हो भुकेले||
(राम पोयाची समर्पि मूठ काव्याची ही प्रेमे सुदामा|)
भाव रुपी अल्प पोहे राम अर्पी हे सुदामा|
फाटक्या वस्त्रांत प्रेमें फार यत्नें बांधलेले ||

पृष्ठ क्रमांक ६

# कट

(दादा आणि वहिनी आपल्या विरुद्ध कांहीं खलबत करीत आहे असें पाहून वन्सं विनोदानें म्हणतात:-)

जिथें तिथें मी कशि तडफडते| मजमुळिं वहिनी ठाउक नव्हते ||
उगीचच चिडतां तुम्हि चडफडतां |
मनास येतें तें बडबडतां||
खपेल मजला मुळिं नच आतां|
तुम्हास अगदीं साफ सांगतें||

कुजबुज पण हो तुम्हिं का करितां|
बघुनि मला हळु बोलुं लागतां ||
विचारतां तुम्हि खालिं पाहतां |
काय सांगण्या तुमचें जातें||

उगिच वाटलें मजला अपलें|
पाहुनि यावें मनिं मी म्हटलें||
इकडे इतकें कोठें अडले|
आले म्हणुनी कुठें बिघडलें ||

हवें म्हणा तरि तुम्हि मज चावट|
करीन पण मी पुरती खटपट ||
मोडिन तुमचा सगळा हा कट |
पृष्ठ क्रमांक ७

कसें न लागे भांडण बघते ||

सहज बोलणें उलटें लागे|
रागावुनि तुम्हिं भरतां रागें ||
काय करावें लहान जागे |
(लहान रात्रहि थोडी मोठीं सोंगें ||)
नाकपुडिंत हरि कीर्तन होतें ||

पृष्ठ क्रमांक ८

# गणेश प्रार्थना

जयति जयति जय सिद्धिविनायक| जय गण नायक मंगलदायक ||ध्रुवपद

रिपुवर दल हें निर्दाळाया
देई आम्हा बल गणराया
तुझ्या कृपेची पसरी छाया
त्रिविध विविध संताप विनाशक

थोक निराळे अमचे झाले
फूट वाढली बंधन सुटले
जोड दुवे हे भगवन् सगळे
        अमची स्थिती ही कितितरि जाचक

परत यावया मुलें कचरती
कळपांतुनि मृग निघुनि भटकती
खिल्लारांतुनि वत्स निसटती
            वळवूनि आणी शिशु मृग शावक

गाई भटकती वळवी त्यांना
वाघही पसरती वनीं मुखांना
कसाब सरसावती सुऱ्यांना

पृष्ठ क्रमांक ९

दिला जन्म तरि करि तत्सार्थक

जन मन कापुस पिंजारावा
गुण बंधनिं तो घट्ट वळावा
विविध रंगि पट मग सजवावा
                अन्वर्थक हो शिशु गणनायक

विविध शक्ति ही एकवटावी
प्रचंड खळबळ मनीं उठावी
संघ शक्तिची मंगल देवी
                होवो जगिं खलदल-बल नाशक

पृष्ठ क्रमांक १०

# उत्तर

नुकतें घर हें मला मिळे|
अजुनी पोतविलें न रंगलें||
न कपाट तयार एक ही |
बिजली ही न अजून घेतली ||१||
न पलंग बिलंग तयार जाहले |
मजली एक असे मुळीं घर||
न च मच्छरदाणि एकही |
अशि कां घाबरतेस यावया ||२||
(अशि का उत्सुक होशि यावया)
तुमचें लिहिणें तुम्हां रुचे|
मज येथें पण कांहिं ना सुचे ||
अगदीं न चढेल रंग का ?|
असले मी समजा घरीं जरी||३||
बिजली चमकोत ची न का |
जरी मी येऊनही राहिले अधी ||
पृष्ठ क्रमांक ११
मज मच्छरदाणि ती हवी |
विणलेली प्रणयात्म तंतुची ||४||
घर अन्य कसें हि हो असे असो|
हृदयाचा अपला महाल हा ||
किति रंगित तो मनोहर |
किती रत्नें जडलीं तिथें अहा ||५||
असु द्यां जुनि खाट मोडकी |
हृदय स्वामिनि मी असो पण ||
उघडो तिथलें कपाट, मी|
म्हणजे ठेविन सर्व आपलें ||६||

पृष्ठ क्रमांक १२

# समस्यापूर्ति

॥ आला इथें जगतिं कोण रहावयाला ? ॥

संपत्तिवैभव तसे सुत आणि दारा ।
सारा जगीं त्यजुनि संचित हा पसारा ॥
जाती समग्र नर देव तसे लयाला ।
आला असे जगतिं कोण रहावयाला ॥ १ ॥

पक्षी नभांतुनि जसा जगिं झेप घाली ।
लोकीं फिरे विविध ये मग जीव खालीं ॥
रात्रीं निजून घरट्यांत पुन्हां उडाला ।
आला असे जगतिं कोण रहावयाला ॥ २ ॥

पृष्ठ क्रमांक १३
टीप: पृष्ठ क्रमांक १८ वर पुनर्लेखित केलं आहे!

# 'आई मला लालु ग दे न थोला(/थोड़ा) ! '

'आई मला लालू ग दे न थोला (/थोड़ा)' |
नैवेद्य बाळा ना अजून झाला ||
 गेली कुठें अम्मळ आंत आई|
 वाटी तुनी लाडु उडून जाई ||१||

'लाडू कुठे' म्हणुनि माय विचारि बाळा|
'आ वासला' जननिला मग ते उमाळा ||
वाटींत तो शिशु मुखीं प्रभुला मिळाला
वाटे सुतृप्त भगवान् जणुं काय झाला ||२||

लागे पटापट मुखा मग चुंबण्याला|
ती आठवी मनिं मनोहर कृष्ण लीला||
लोणी हरी करि करें अति घट्ट गोळा|
माता घरांत असतां करि गट्ट भोळा ||३||

काठी उगारित जयीं जननी यशोदा|
तो इंद्रजालिक महान् करितो विनोदा||
पृष्ठ क्रमांक १४
काढून आवरण तो घडीत उघडीत दृष्टि
(वात्सल्यपूर्ण हृदयीं उघडे सुदृष्टि
प्रेमें-अदृश्य बघ)
लागे दिसूं तिज अदृश्य विभिन्न सृष्टि ||४||

ब्रम्हांड गोल जणुं तो नवनीत गोळा
झालें जगत् वदनिं एकवटून गोळा
गोळ्यावरी जणुं खगोल भुगोल चित्र
पाही अहा जननि सुंदरतें विचित्र ||५||

(होतो पवित्र समिधेत कृशानु-लब्धि)
अग्नी पवित्र समिधेंत प्रवेश पावे
(मावे अगस्त्य ऋषि अंजुलि आंत अब्धि)
अब्धी अगस्त्य ऋषि अंजुलि आंत मावे
ब्रह्मांड ही सकल सावधि पिंडिं राहे
प्रेमास (ज्ञात्यास) हें दिसत अन्य न कोणि पाहे||६||

सांगोत प्रेम अंधळे अंधळे बिचारे
प्रेमांत (मग्न)दिव्य हृदयांस दिसेच सारें
हें दूरसूक्ष्मतम दर्शक यंत्र आहे
माता म्हणून वदनीं मग विश्व पाहे ||७||

पृष्ठ क्रमांक १५

विश्वात्मता स्फुरुनि जेथ बुडे पृथक्त्व
तेथें रमे हृदयतें न जिथें निजत्व
आत्मीयता विसरली विसरून देहा
प्रेमांत सर्व बुडला मग भेद 'तो' -'हा'||८||

(तोंडात त्या चिमुकल्या जग कीं बुडाले
ध्यानीं तिच्या हरी कथानक -मर्म आले ||८||)/

झाली तिची विकसिता अति नव्य दृष्टि
गोपाळ कृष्ण हंसता हंसली च सृष्टि ||९||
(लागे हंसू शिशु तिची तशि भावसृष्टि)

# महात्म्याचें तप(६.१०.३२)

(महात्मा गांधीचा उपवास : तारीख 20 सप्टेंबर 1932 ला सुरू झाला. महात्म्याच्या या तपानें भारतमातेच्या हृदयांतच कशी खळबळ उडाली होती ह्याचें या कवितेंत शब्दचित्र काढलें आहे)

हिंद देविच्या पद पद्मा वर पवित्र निर्मल निज काया|
तयार झाला गांधि महात्मा सुरभि सुमन अर्पाया ||
उच्च जातीच्या हृदय हृदय वेदिवर ढग ढगणाऱ्या जाळांत|
उडी घ्यावया तयार झाला कळ वळून निज चित्तांत||
दिव्य भयंकर करण्यांलागे सर्व देवता थरथरल्या |
हिंद जणांच्या मनोभूमिका फार खोल किती हादरल्या||

येरवड्याच्या यम सदनांतरिं यम लागे जणुं (हिंडाया) फिरकाया|
मृकंडु सुतसम मोहनकंठीं फांस लागला फेंकाया ||
मोठ्या चा अति व्यापक आत्मा हलवी द्रववी सर्वांला|
सहसंवेदन तीव्र होत असे स्थावर जंगम जगताला||
ध्वनी निघाले 'हं हं थांबा चुकूनि नेती मुनिनाथा |
अनंत रसना थकल्या ज्याची गाता शुभगुण गणगाथा||
दिव्य तपो निधि सत्व मूर्ति हा बघुनी पळतो कलि ज्याला|
कुठे नेत असा सोडा (सोडा/) त्याला हिंद जननी च्या कलिजाला||
सळसळ सळ उकळी फुटली अंत: सृष्टी खेळ वळली|
दगडाची ही निर्दय वृत्ती गूढ गुहान्तरिं कळवळली ||
भारत माता द्रवली बघुनी (अस्पृश्यांची ही दैना/ प्रायोपवेशी तपोवनात/ पुरश्चरणपर तपोवधना/) विकट तपोधन सुत निधना ||
फोडुनि दगडाला नयनातुनि झरझरल्या गंगायमुना|
भुमातेच्या हृदयांतिल पय खोल विहीरींतुनि उसळे|
पयधारा वर प्रेमें आल्या अछूत तनयाकडे वळे ||

मूर्ति सचेतन होउनि मी म्हणती बाळांनों जणुं भेटा या|
दोन्हीं दारें उघडलि जणुं हे हात पसरले भेटाया||
रूढि राक्षसी दार सोवंळें बंद ठेविलें नेमानें |
आज उघडिले विश्वबंधु -मन मोहन गाड प्रेमानें||
अस्पृश्यांच्या विमल स्पर्शें पवित्र झाली सरस्वती|
रूढिशि भांडण मिटलें; भांडति जैशा जणुं सवती सवती||
दूर दूर जे भिउनि राहती जवळ त्यांस घे सरस्वती |
पाजुनि त्यांना ज्ञानामृत मग पुढिल थांबवी अधोगती||
(मनो देवता जागृत करि हा आत्मयज्ञ कींव करुनी)
दिव्य तपांतुनि तेज: पुंजा मङ्गल मूला कृश काया
पुन्हा प्रगटली मोहन मुनिची अमङ्गलाला पळवाया
जिकडुनि तिकडुनि मंगलतारा आल्या हृदयांतिल धारा
सुमनें वर्ष ति अपारतशि जणुं जनहृदय नभांतिल तारा
भारत जनता मनोदेवता जागुनि विनवी प्रभुराया
मोहनास चिर वांचावि रामा निज देशहितास कराया

टीप: चित्रमय जगत डिसेंबर १९३२ ला प्रकाशित झाले
०६.१०.१९३२ ला ही लिहिलेली आहे

# आई मला आई मला लालु दे ग न थोला(ड़ा)

८.१०.१९३२

'आई मला लालू दे न थोला'|
`नैवेद्य बाळा न अजून झाला||
गेली कुठें अंमळ आंत आई
वाटींतुनी लाडु उडून जाई ||१||

`लाडू कुठें' म्हणुनि माय विचारि बाळा|
`आ वासला`; जननिला मग ये उमाळा||
वाटींत तो शिशु मुखीं प्रभुला मिळाला|
वाटे सुतृप्त भगवान् जणुं काय झाला ||२||

लागे पटापट मुखा मग चुंबण्याला |
ती आठवी मनिं मनोहर कृष्ण लीला||
लोणी हरी करि करें अति घट्ट गोळा|
माता घरांत असतां करि गट्ट भोळा ||३||

काठी उगारित जयीं जननी यशोदा |
तो इंद्रजालिक महान् करितो विनोदा||
(काढून आवरण तो उघडीत दृष्टी) |
(लागे दिसू तेज अदृश्य विभिन्न सृष्टी ||४||)
काढून आवरण जागवि भावनेला|

वात्सल्य देइ नवचालन कल्पनेला||४||
वाटे तिला क्षितिज आंत गळयांत आहे |
आकाश सर्व वरच्या वर गोल राहे ||
पाताळ खालिं वदनीं अवकाशिं राही
(जणुं काय राही)|
गोळा डब्यात तसल्या जणुं माय पाही||
पृष्ठ क्रमांक १९
ब्रह्मांड गोल जणुं तो नवनीत गोळा|
झालें जगत् वदनिं एकवटून गोळा ||
गोळयावरी जणुं दिसे तिज (प्रगटले जणुं) विश्वचित्र
(गोळयावरी स्फुट खगोल भुगोल चित्र |
रा ही जसें; तिज तसें दिसलें विचित्र||)
प्रेमाचि सृष्टि तशि दृष्टि असे विचित्र ||६||
सांगोत प्रेम अंधळे अंधळे बिचारे|
प्रेमांत दिव्य हृदयांस (बसेच)दिसेल सारें ||
हें दूरसूक्ष्मतमदर्शक यंत्र आहे |
पाहीन जें कुणीही तें पण प्रेम पाहे ||७||
आत्मीयता विसरली विसरून देहा|
प्रेमात सर्व बुडला मग भेद 'तो' 'हा'||
तोंडांत त्या चिमुकल्या सगळें बुडाले |
ध्यानीं तिच्या मग हरिकथानक मर्म आलें ||८||

पृष्ठ क्रमांक २०

# रसानन्द

विचारांच्या धारा झर झर झऱ्यांतून (झरल्या) उठल्या|
हजारो शब्दांच्या अभिनव हजाऱ्यांत भरल्या||
सतृष्णा भक्ताच्या मृदुल हृदयीं खोल शिरल्या|
तिथें होती तेव्हां समरससुवृत्तींत विरल्या||
*रुमालाला कोणी करि निज कुणी मस्तक पुढें|
सुगंधी हें
गुलाबाचें पाणी कण कण च सर्वांवर पडे||
दिसे कोणी येतां मज जवळ पाहून विरळा|
पुढें झांकी डोळे हृदय उघडे स्वस्थ बसला||
पडो; वाटे त्याला, सकल रस हा पूर्ण भिजवो|
रसानंदामध्यें बुडवुनि मना ताप पळवो||
निजानन्दें होतीं तरल बुबुळें घूर्ण नयनें |
तनू झेले त्याची अहि सम जणूं गीतश्रवणें||
बाल दुहिता, मी काव्य गात असतां मज देई टाळया|
जो ना कुणास करूं दे, न करी कुटाळया ||
टीप:* हात रुमाल किंवा डोक्याचा रुमाल

पृष्ठ क्रमांक २१

ज्याचे स्फुरे हृदय,नेत्र सुरू हंसाया
लागेच यद्हृदय लोचनही स्फुराया
त्याच्यापुढे स्फुरण ये कविता म्हणाया
बडबड करणाऱ्यां थांबवी बोलु दे ना
सुकवन रसपाना (सुरभी कवन गंधा) वीण ज्याला सुचेना
परम रसिक वर्या यांसमी प्रेम भावें
नमुनि कवन गातो हर्ष चित्तीं नमावें

पृष्ठ क्रमांक २२

पूर्ण रिकामा

पृष्ठ क्रमांक २३

# फेरिवाला

(एक टोपिवाला फेरिवाला)
हा कसा हो टोपिवाला (फेरिवाला) येत असे टोप्या विकाया|
कोण आला टोपिवाला आमच्या टोप्यास न्याया |
(जाय टोपी जाय शेंडी)
नेइ टोप्या आमच्या जो (टोपि गेली शेंडिं गेली) कांहि जाणें तो न न्याया ||
राहिलें डोके ठिकाणीं सर्व कांहीं पावलें हें |
पांढऱ्या हा पावला चा काय त्याची दिव्य काया ||
काय डोळे काय कान्ती शान्ती मूर्ती काय गोरा |
आंत काळा कोळसा हा काळसा त्याला न माया ||
झांकली नेली फुलांनी आंत काळी कीं गुहा ही |
काय हो ठाऊक होंते फोल सारी शब्द माया ||
थांब थोडा मी म्हणालो देत मी थोडाच थारा |
तो उडाला
हातिं आलें सर्व नेलें राहिलें कांहीं न खाया ||
फेरिवाले रोज आले एक किंवा दोन सांगू |
भाळलो मी त्यास कैसा लाज वाटे कीं कथाया ||
आळ कोणाच्या वरी हो व्यर्थ घ्यावा चूक माझी |
सर्व आळी धुंडिली तो कोठला आतां दिसाया ||
सर्व त्याचा पक्ष घेती वाटते त्याचीच आळी |
एकट्याची भांड-खोराची विनंती जाय वाया ||
पृष्ठ क्रमांक२४
या पुढें हो बांधवांनों आपल्या संघातला मी |
माफि द्यावी राम भिक्षा मागतो हा एक व्हाया ||

# पहाडी भारतीय वीर

सोड तूं खुशाल सोड शत सहस्त्रशर शिरीन
 खुपस उरिं सुरी खुशाल
 मार करुनि हाल हाल
धरिन शस्त्र मी न बाल बालिका वरी करीं
 निरपराध या न काय
युवति रडति धाय धाय
कवळतात शिशुंस माय प्रेम बंधनान्तरीं
 बन्धु भगिनि सजल नयन
युवति धरिति स्वपति चरण
बघति रडति दीन वदन सकल विकल अंतरीं
 एकवार एकवार
ते करोत कीं त्यांस दे करूं प्रहार
 अन्यथा न त्यांस ठार, जा मुळीं न मी करी
झुकवितां  न वळवितां न
 ये तुला; कला विहीन
तूं लता उपवनास (पूर्ण) रान करिशि काय सत्वरीं
पृष्ठ क्रमांक २६
तव कसा बसा उपाय
 ढकलशील गाय काय
पहि दीन धरिति पाय, खड्ग धरिशि त्यां वरी||
पर्वतात राहतात
दगड शून्य भावनांत
समजशी अम्हां मनांत, चुकशिं अगदिं तूं तरी
 प्रेम मेघ वर्षतांत
 खोल पर्वतांत आंत
 कवण प्रेम संचयांत, करिल बघ बरोबरी

भरूनि दुथडि जलकणांस
स्रवति अचल भावनांस
हर्षविंति तरु लतांस, शिरुनिं वनिं वनांतरीं
मदिय हृदय चिरुनि पाहि
वाळवंट तेथ नाहि
विमल सुमन गंध (वास) राहि, तो भरो (शिरो) त्वदन्तरीं

# जा सारखा खणत खोल गभीर खाण

जा सारखा खणत खोल गभीर खाण|
खालून सत्वर हिरा वर बाळ आण||
यत्नें सुसाध्य जगिं काय न सांग बाळा|
संसार सारविण वाटतसे गबाळा ||१||

मागें समुद्र मथिला सुर दानवानें|
रत्नें चतुर्दश तिथें निघती श्रमानें||
हालाहल प्रथम ये वर मंथनात|
जैशी मळी फुगुन ये वर साखरेंत || २||

पाहून जाळत असे अखिल अखिला जगाला|
त्याला म्हणून शितिकण्ठ क्षणांत प्याला||
तैसाच आळस तमोगुण मूल बाळा |
होई शिवप्रकृति तूं करि भस्म त्याला ||३||

तंद्रा तशी वितरते वरूनी सुगंधा|
आंतून मोहिनि परी कपट प्रबंधा ||
ठेवी शिरींकर अनुग्रह भाव दावी|
पृष्ठ क्रमांक २८
डोलावयास जनतेस सहर्ष लावी||४||

पृष्ठ क्रमांक २९

# तेजस्व्यास

तेजस्वी माणसास उद्देशून
(अवेळ जरि,.....)
तेजस्वी झाल्याचे
स्वतंत्र वाऱ्या(वर) परि उडणाऱ्या उंच भराऱ्या मार
कोंदट कुजटहि हवा येथली
प्रकाश किरणें सकळ लोपलीं
नुसती येथें राख पसरली

हिऱ्या तुझी ही चमक झांकुनि जाइल सारी पार
येथिल बाबा, कलुषित वारें
धूलिकणानें भरलें सारें
संतापाचें ढग वाफारे

त्यांच्यावर संचार करी कवि, निर्मल गगनिं विहार
कोळि पारधी तुज भंवताली
पसरति जाळीं वरती खालीं
अडकुन जाशिल तूं सांभाळी

निसट येथुनी वर वर जाई (बाळ समंजस तूं), करुनी नीट विचार
स्वार्थाच्या वर लाटा उसळती
*मकरी केंद्री तेथें वसती
श्वासें खालीं सर्वां ओढिति

पवनसुता परि पराक्रमा तू, प्रगटवि होइ पसार
* सिंहिंका
पृष्ठ क्रमांक ३०

अवनीचें कीं अवन कराया
खलजन संतापा शमवाया
मेधापरि तूं हो खग राया

उंच उंच हिंड उंच तूं उंच परंतु उड पण तूं खाली सोड दयेची धार
घरट्या मधुनी तोंड काढुनी ती । पथां कडे तव पिलें पाहती
चोंच उघडुनी वरतीं करिती
कृपा बिन्दु कण पावन प्याया झालीं उत्सुक फार

पृष्ठ क्रमांक ३१

# (एकामेका) पाठच्या बहिणी

'माझी बॅग कुठे'? 'असेल पडली ती आड कोठें तरी' !|
`जीजी, ठेविशि काल पुस्तक कुठें'? 'बाहेर वाटे वरी' ॥
'मी सांगेन पहा न धुंडिशि जरी   दादास येतां घरी' ।
'जा,जा, सांग तुझें हि त्यांस पण मी सांगेन (काही तरी/ पाही तरी/)आल्यावरी' ॥

'केव्हांची किति हांक मारित असे जीजी पहागे तुला' ।
'हांका मारित तूं खुशाल बस कीं ऐकूं न येतें मला' ॥
कागे केली काकुळती तुला किति तरी, ' का गे न तूं ऐकशी ।
सारे ऐकत मी मुळी न बहिरी तूं बोल वाटे तशी ॥

आहों आपण नाहिं काय बहिणी तूं आपली नेहमी वांकडी
आहे मी बघ नीट नेटस तुझ्या पेक्षां कशी फांकडी
(कन्या या तुमच्या विनोद करिती तो ऐकला का तुम्ही)

(चाले/ एके मंगल हा विनोद जननी येऊन)
जीजी काय कधीहि नीट च तुला कांहीं न ये बोलता
ये तिज रडें ' ते बोलणे ऐकतां
हे ग कोण म्हणेल ?

ऐके मंगल हा विनोद दुरुनी धावून ती माय ये । पोटाशी धरूनी म्हणें ' उगि उगी,' बाळे रडूं तूं नये'
'वेडावीत सदैव जीजटलिही तूं हीस रागे भर '। 'येऊं दे घरि थांब,(थांबवि रडें) ; पाठ दिसते आली तिची ग वर

पृष्ठ क्रमांक ३२
पूर्ण रिकामा

पृष्ठ क्रमांक ३३

**लिहून खोड़लेलं**

ही कृति पुढील पृष्ठ क्रमांक ३७ वर पुनर्लेखन केलेली आहे!
पृष्ठ क्रमांक ३४
पूर्ण रिकामा
पृष्ठ क्रमांक ३५

# प्रभात प्रणय

(१)
आश्लेष कंठांतिल सैल झाले|
'सोडा अता' कोकिळ कण्ठ बोले ||
' झाला पुरे खेळ' सलज्जबाला|
प्रेमें म्हणे 'काय करावं याला'||१||

'पाहिल कोणी नं सकाळ झाली|
जागी दिसे आपलि सर्व आळी'||
अत्यंत जो उत्सुक होय जाया|
जाया तिचे यत्नहि जाति वाया ||२||

त्या संकटांतून सुटावयाला |
ती हांक मारी (प्रिय छनुल्याला) निज बालकाला||
जागें तिचें तों मग बाळ झाले|
'शाबास बाळा',बोले 'बघ थांब आले' ||३||

रागें भरुनी झिडकारुनी ती|
पत्नी पळाली पती खिन्न चित्तीं||
माझें पहा छोनुकलें शहाणें |
लागे म्हणाया मग गोड गाणें ||४||

शिशुस घेऊन हसून दारा |
दारांतुनी सोडि कटाक्ष धारा||

चिंतामणी वा मम कामधेनू |
कीं कल्पवल्ली शिशुरूप भानू||
कीं हा महान् मोहन मंत्र माझा|
झाला असे जागृत बालराजा ||४||

संसारिं कीं संकट सागराची |
ही बाल नौका जननी यशाची (जया)||
आतां करूं कोण शकेल काय|
अजिंक्य झाली जगतास माय||५||
पृष्ठ क्रमांक ३६
दुरून बोले मिचकावि डोळे |
'भोळे तुम्ही हो किति शुद्ध भोळे'!||६||

हा बाळ राया मज सोडवाया |
तयार आहे तरि या धराया||
येतां कसें मी म्हणते पहातें|
बोले 'अहा हा!,खिजवीत जाते (हिणवीत हातें (जाते) ||७||

पाहून भावोत्कट रम्य लीला |
पाहून त्या सुंदर माऊलीला||
' जा जा बरे'! तो हंसुनी म्हणाला|
घेईन व्याजासह मुद्दलाला ||८||

पृष्ठ क्रमांक ३७

# रात्रीं दहाला सुरू कोर्ट झाले

रात्रीं दहाला सुरू कोर्ट झाले
रागांत वाद प्रतिवादि आले
आरुढ अंकांसनिं बाळराजे
त्यांच्या मुखीं हास्य कळा विराजे||१||

मांडीवरी घेति उगीच झोके
त्यांच्या प्रलापास न कोणि रोके
डौलांत स्वारी डुलते तयांचीं
तों होय फिर्याद सुरू पित्याची ||२||

' माझें हिनें  चोरुन चित्त नेले
तें पाहिजे आज मला मिळाले
लुटावया ही मजला निघाली
कोणी न माझा जगतांत बाला ||३||

सर्वस्व माझे तुम्हि बाल राजे
निकाल द्या जो समयास साजे
हातांत सारें तुमच्या असून
टाळू नका व्यर्थ असें हंसून ||४||

पृष्ठ क्रमांक ३८

विकासले लोचन ;माय बोले
 लुटून ह्यांनीं मम कुंज नेले
 त्याच्यांत मन्मानस हंस गेला
(कोंडून कां ठेविंती हे तयाला)
हे कोंडती का पिंजऱ्यांत त्याला||५||

माझें न देतां मज मागण्याची
 ही कोठली रीत असे भल्याची
 साक्षी पुरावा सगळे हि माझे
 साक्षात् तुम्ही सुंदर बालराजे ||६||

 ह्याचा निवाडा पहिलेच व्हावा
 काहीं वेगळे तरी मोबदला मिळावा
 मी कोण हे कोण धरून ध्यानीं
 निकाल (द्यावा) व्हावा तुम्हि बाळ पूर्ण ज्ञानी ||७||

 'बर्र,बर्र बर्र,बर्र शिशु जज्ज बोले
 इंटर्वलाला मग अंकिं लोळे
(तो झोंपला तो उपहार घेता
 झोंपेंत तो होय योग्य निकाल देई)
पृष्ठ क्रमांक ३९

मजेंत चाले सगळा फराळ
बोले मधे लॅटिन ग्रीक बाळ
(केव्हा म्हण म्हणे काय कळेना बाळ) ||८||

पाही कधीं दूध पितां-पित्याला

पाही कधी तो जननी मुखाला
तों लागला त्यास लगेच डोळा
(कोणी कोणांनी वाटो पण बाळ भोळा
झोपेत साराच निकाल आला)
हवा तसा त्यास (झोपेत साराच) निकाल झाला ||९||
पृष्ठ क्रमांक ४०

# पांढरा केस

१६.०२.१९३३
(मिशांच्या मधोमध अवचित दिसलेल्या ताठ उभ्या पांढऱ्या केसांस पांढरे केसास पाहून)
मज केस मिश्यांत पांढरा
दिसला बाण शरासनीं खरा
निरखून पहातसे मला
हृदयीं तीव्र नितांत बोंचला ||१||

वर शुक्ल दिसे ; असे तरी
अति काळा जणुं तो निजान्तरीं
चमके जशि कांत ती वरी
पण काळयास लपवि निजोदरीं ||२||

अथवा हंसते न मीं जरी
तरि काळी किति रात्र अंतरीं
वरुनी स्मित हें कीं विन्धी करी
सरसावी हंसरी जणूं सुरी ||३||

अथवा कुणि गौर काय हा
जणु कप्तान नवा उभा पहा
करुनी वदनास खालती
उभी काळी रिजिमेंट खालिं ||४||

फुटुनी निज जातियां तुनी
घ्या लाउनी दुसऱ्याचा वर रंग
निज कृष्णकृतीस झांकुनी
जणुं ऍप्रूवर होय का कुणी||५||

अथवा नदिच्या तटावरी
झुडुपा आंत बसे बकापरी
वर निर्मल कांति शांत सा
पटु दिसतो आंत न हा तरी ||६||

कुणी काढिती पांढऱ्या वर
जरी काळे; पण रम्य अक्षर
विपरीतच रीत ही परी
उलटा लेख विधी विधी करी ||७||

पृष्ठ क्रमांक ४१

शिरकावुनि पाय पांढरा
भिववी राम तुला अतां जरा
तनुचा रथ ने हळू जरा
दिसला सिग्नल ; दावि डेंजरा

कधिं ही दिसला न जो कुणा
शिरला तो सित काय पाहुणा
(वदना) *सुरतेवर पाय पांढरा *सुरत=मुद्रा
पडला सावध राम हो जरा

---

पृष्ठ क्रमांक ४२
पूर्ण रिकामा

पृष्ठ क्रमांक ४३

# काय नापिका केश कलापा दावि मला तू कला

(जुन्या पद्धतीचा मधून मधून गाणारा डोक्याचा घोट्या करण्यांत प्रवीण न्हाव्यास उद्देशून)
काय नापिका केश कलापा दावि मला तू कला
भला बागवान मला गमला
रान वाढलें काढ तेवढे
चालव तू कातरी
घोट्यास्तव आग्रह तव कां तरी
तास तास कुणि तासति घोटति घोट्याकरिती शिर
चमकती त्या मरूतलीं रविकर
दावुं नको तव कला मला तशि केश वनाच्या पिका

कृपा करी मजवरी करी नापिका
कुशल कलेची केश वाटिका उपटुन फेंकु नको
जुने तव मन नवे धडे शिको
केश कृत्यंता केश निकृतन संभाळुनि तू करी

आहे शेंडी शिर हि तव करी
क्रॉस करून मी हात ठेविले बसलो येशू परी
पाहिजे ते खुशाल तूं करी
स्लोप चांगला दे तूं बाबा
दिसो न ठिगळापरी
सोड कातरीस कुरणावरी

पृष्ठ क्रमांक ४४
पूर्ण रिकामा

पृष्ठ क्रमांक ४५ ४६
लिहून खोडलेलं

# विजली न चिता अजून ही

(विझली न चिता अजूनही |हृदयाची भरली ना की व्रण||
शमला न च दाह अंतरी| तरी विरत व धन्य संयम||
स्व विषदिशा परी तुवा मिळला हा सगळा जयोस्तुते करुनी जणू दिव्य संयम.....)

पृष्ठ क्रमांक ४७

विजली न चिता अजून ही
हृदयाचे भरले न कीं व्रण
शमला नच दाह अंतरी
तरी वीरा तव धन्य संयम
स्व विषाद विषापरी तुवा
गिळला हा सगळा जयोऽस्तुते
प्रणयास दिली तिलाञ्जलि
दिन होतां निधना दहा तिच्या
हृदयंगम चित्र जें तिचें
स्मृतिच्या  सूक्ष्म पटावरी असे
पुसलें इतक्यांत काय तें
श्वासितें वा हृदयाश्रुनें  तुझ्या ? ||३||
सतिच्या रुधिरांत घोळुनी
शिरिं तूं कुंकुम लेप चर्चिशी
वर लाविशि मौक्तिकाक्षता
बुजली का हृदयातली क्षतें ||४||

पृष्ठ क्रमांक ४८

नवमङ्ल मार्ग तोरण
जणुं मंडावळिं दैव मंडन
शिरपेंच शिरीं तुरे तसे
विजयस्तम्भ उभे मनोहर ||५||

मिरवून नवीन मंडपीं
करिं तू कङ्कण बांधिशी तवें
उचलून नवीन तूं विडा
करिशी दिग्विजयास तूं नव्या ||६||

वरूनी बघते सती तुला
पण पर्वा तुज काय ती असें
हंसले जग ही; हंसो तरी
निज कर्तव्य परायणा तुला ||७||

असले कितिही प्रसंगी कीं
जरि आले तरि धैर्य मेरु तू
शिवमङ्गल सावधान तूं
पृष्ठ क्रमांक ४९
करिशी होशि सदैव दैव वान् ||८||

किति मानव दानवा परी
करती क्रूर अशी जगीं कृति धरातली
जननी भगिनी मुळीं चि ही
करिती किंबहुना विटंबना ||९||

कसला जगिं धर्म तो असे
अबलांला न करीं धरी जरी
असला अनुकूल तो जरी
असल्या लंपट स्वार्थ साधुला ||१०||

कुणि रूढि कुणी परंपरा
म्हणती फार जुनी बलीयसी
पण तूं मज धन्य वाटसी
किति वानू तुज स्वार्थ साधुते ||११||

पृष्ठ क्रमांक ५०
पूर्ण रिकामे

पृष्ठ क्रमांक ५१

# पितृ वियोग

मम (/मज) वज्र निपात वाटला
नव वार्ताहर दृष्टिपात तो
फुटले मग तार* फोडता (*तार=Telegram)
शतधा मन्मन शीर्ण जाहले ||१||

सुविसंगत तार बोलली
जननी जीवन राग बेसुरा
मग भेसुर चित्र ते उभे
जननीचें मम चक्षुच्या पुढें ||२||

इतके जन रूढिला बळी
पडले का असतील लश्करीं
करतील विरूप वृद्धशा
मम प्राण-प्रिय माउलीस का ||३||

मम ज्येष्ठ कनिष्ठ बंधु ही
सगळे आप्त तसे सुहृज्जन
करू नी मन घट्ट आपलें
नयनें का बघतील दृश्य हे ||४||

स्वयंमेव असे तपस्विनी
सगळ्या जीवनि जी विरागिनी
पृष्ठ क्रमांक ५२
अति पावन दिव्य देवता
जननी पुण्यवती सती मम ||५||

(परमार्थ घडे तिला कसे)
म्हणे करीत
जणुं फेन कलाप मस्तकीं
धवलाङ्गी स्वयमेव जान्हवी
तिज रूढि म्हणे करीतसे
जणुं गंगेस भगीरथात्मजा ||६||

अथवा विमला सरस्वती
जणुं ही मूर्तिमती गमे मला
परमार्थ घडे तिला कसे
शिकवी रूढि स्वतां(/यं) निशाचरी ||७||

जननी मम पूर्ण चंद्रिका
अति सौम्या रमणीयशीतला
तिज रूढि नितान्त तामसी
कशि दावील अमावसी द्युति
पृष्ठ क्रमांक ५३

सकलेंद्रिय शक्तीच्या सह
बसुनी स्वैर मनोरथा वर
कधिं चा घरिं थेट पोंचलो
अपल्या आवडत्या जगामधें
बघते मम कल्पना जिथें
जननीच्या मुखमंडलान्तरीं
रवि जाय जसा नभांतुनी
विलया कुंकुम जातसे तसे
रजनी पसरीतसे जशी
निज साम्राज्य दिशामुखीं तशी
जननी वदनीं विषण्णता
पसरे दीर्घ तमा तमस्विनी
बघतां शिरिं केशविक्रिया
मनिं संवेदन तीव्र होतसे
तीव्र होत असे
हृदयांतिल क्रंदनध्वनि
श्रवणाच्या मम रंध्रिं आदळे.
सशरीर धरीं पुढे पुढे
पृष्ठ क्रमांक ५४
जितका सन्निध येत चाललो
तितका मनिं क्षोभ वाढला
घरिं जातां फुटलीं सरोवरें
जशि उन्मळुनी लतां पडे
पडतां आश्रय वृक्ष भू वरी
जवळील लहान सा तरू
निज अंगावर सांवरी तिला
बसलों जयि मी तिच्यापुढे
कर बंधीं तिज सांवरीत मी
हृदयावर माझिया गदा

पडले धाड विकेश मस्तक
हृदया मम हालवावया
श्वसन स्पंदन हुंदके सुरू
बघुनी मनिं मी म्हणे पुढे
अगं रूढ किति क्रूर तूं अशी
पृष्ठ क्रमांक ५५
अशि मूर्ति करून खंडिता
करिशी मङ्गल ही अमङ्गला
करणी करिशी कसाबशी
मुख काळें कर सोड भारता
मम केविलवाणी बालिका
सगळे धुंडुनि पाहते घर
जननी जवळीहि येउनी
क्षण पाही टक लावुनी तिला
पुसते मज बाळ मोहिनी
' नच आई दिसते कुठे कशी?'
जननी तिज हांक मारिती
पण ती जाय तिच्या न संन्निध

पृष्ठ क्रमांक ५६
रिकामा
पृष्ठ क्रमांक ५७
लिहून कट केलेला

# आराम खुर्ची वर ती बसून

पृष्ठ क्रमांक ५८
लिहून पूर्ण कट केलेला
पृष्ठ क्रमांक ५९

आराम खुर्ची वर ती बसून
वाचीत असे पुस्तक ; हें बघून

हंसून आडून धरून नेम
फेंकीतसे फुल कुणी सप्रेम ||१||

फुलावरी फुल वरून
भांबावुनी बोलत 'इश्शबाई'
चाले फुलांचा किति गोड मारा
सुगंध दाटे हृदयांत सारा ||२||

तो पुष्पधन्वा न समोर येई
आडून तोंडावर वेध घेई
चुकू न कीं बाण अचूकते त्याचे
तिच्या मनीं लागतिल सर्व साचे ||३||

अत्यंत ती गांगरताच कान्ता
सभोवती उन्मुख पाहि कान्ता
डोकावुनी तो बघतो गावाक्षीं
पाहून त्याला हंसली मृगाक्षी ||४||
पृष्ठ क्रमांक ६०
दृष्टीस त्याची भिडतांच दृष्टी
ती थांबली पार्थिव पुष्पवृष्टी
पीयूष धारा नयनीं निघाल्या
तल्लीन वृत्ती अधिकांशिं झाल्या ||५||

हे काय बाई किती माणसाला
हा त्रास द्यावा न कळे कुणाला
पुष्पें जरी कोमल पाकळयांची
तीं लागतीं काय न मोगऱ्याचीं ||६||

माझे न बाबा तशि येथ आई
काका तसे न दादा करुं काय बाई
करून इको हवाली
करून गेले इकडे हवाली
माझा असे कोणि इथे न वाली ||७||
मी राहते येथ न मार खाया
पृष्ठ क्रमांक ६१
स्वामीण मी येथे असे
गाई न मी मार
सांगून गोष्टी मज गोड नाना
थाटांत येथें मज आणिलें ना!
का ठेविले येथ मला छळाया
खोटी असे का इकडील माया ||८||

मी येथली काय न मालकीण
सांगा तुम्ही सर्व कला प्रवीण
हा वाढवूं वाद कशास वाया
आले पहा हक्कच गाजवाया ||९||
पृष्ठ क्रमांक ६२
आहे खांच विचित्र दीड वितिची, त्याच्यांत सारें भरा

# दिंडी: 'मिठी लवकल तूं माल माला ताई(/आई/माई)|

'मिठी लवकल तूं माल माला ताई(/आई/माई)|
बाल माझें तूं ; काय मी न आई'||
करुनि अपले ती हात उंच बाळ
करा ची ती घाली गळयांत माळ

पुढें लागे ताईस(/आईस /माईस)थापटाया
तोंड लागे हळू कांहिं ही पुटपटाया
'भूत लादलि दे तायला तुला ताई
थांब देते मी दूदु तुला बाई
हळूच झबलें मग उंच ती करून
म्हणे 'पी, पी तूं दूदु हें लवून'
म्हणे गाणें ती 'येद येद दाई (गाई)
दूदु देई; कल बाल ताइ (आई) दाई'

पृष्ठ क्रमांक ६४ ६५

# अर्ज़

(टीप: एकूण २० ओळींचा हा अर्ज फारसी शैलीत ६५ नंबर पानावर सुरूवात झाली आणि ६४ वर संपविला आहे!)
(६५)

Resequenced
पृष्ठ क्रमांक ६५

# अर्ज़ (१)

हिदायत तुम्हा दिली कितितरी कई मर्तबा
कळेना तुमचा तुम्हा न रुतबा तसा मर्तबा

न बाज तुम्हि येतसां बदलता न या आदती
न गौर करतां तुम्ही कठिण हा जमाना किती

मुअत्तिल तुम्हास मी म्हणुनि आज केले असे
करीन बरखास्त हो सुधरला जरी ना कसे

कितीहि दरखास्ति द्या नजरसानि* ला हो तुम्ही (*नजरसानि= पुनर्विचार)
न लेकिन कधी पुढे तरी मुळिंच कांहि ऐकेन मी
पृष्ठ क्रमांक ६४
गुज़ारिश जनाब च्या ख़िदतमती मधें पेश ही
हुज़ूर फ़र्माविती शक नसे असे तें सही

कसूर अलबत् मला ज़रि क़बूल माझा असे
हुज़ूर चरणां बिना मज कुठें सहारा नसे

कलील* तनख्वाह वरी करीत मी गुजा़रा असे
अलील@ घरी बायकोमुलें त्यां जवळ एक पैसा नसे

उदार दिल आपला मेहेरची निगा (नज़र) आपली
निहायत हि सादगी हुज़ूरच्या मिजाज़ांतली

कितीतरी कसूर मी करूनि माफ झाली ख़ता
अतांच महरूम मज हुज़ूर कां ठेवितां

मुनासिब (तकर्रुर#) तरी करा हुकुम खाकसारास द्या
ज़रूर वळुंद्या उद्या हुज़ूरच्या रहम् च्या नद्या

*=कलील=खास, विशेष,दुर्लभ, दुर्मिळ
@ अलील=, दुर्बल,रुग्ण,कमजोर,दुबळया मुक्या.
# तकर्रुर = बहाली, तैनाती, नियुक्ती

# गुलाल

तो लागला कांहि लिहावयाला
विचारमाला करि गुंग त्याला
पाहून मागून लपून येई
चाहूल देखील न लागु देई ॥ १ ॥

गुलाल फांसून पळे कपाळीं
तंद्री खुले ; तोहि जगांत आला
रागांत जागा दचकून झाला
झाले तयाचे (पतीचे) मुख लाल डोळे
खजील झाला; पण चित्त आंत डोले

विद्युत्परी ती तळपे पळून
उल्हास भासिं दिसलीं खुलून
उत्कर्ष पाहि अपल्या जयाचा
बिंबून मुद्रे वर स्पष्ट त्याच्या
डोळे तसे मान हि नाचवून
' आतां कसें हं !!! वदली दुरून ॥ ४ ॥

पृष्ठ क्रमांक ६७

'माझ्या मुळीं जाऊं नयेच वाटे
स्वभाव माझा कळला न वाटे
कधीं कुणाची गय मी करीना'
तिला हंसें नंतर आवरी ना ||५||

हळू पुढें सान्निध येत थोडी
त्याच्या वरी ती पिचकारि सोडी

फुलें कळया सर्व वसंत सेना
प्रेरित प्रेम शरांस नाना
त्याला करी ती पुरताच गार
गळ्यांत घाली नव प्रेम पुष्पहार
उत्फुल्ल नेत्रात कलाविहार ||७||

लज्जा स्मितें भूषित लाल गाल
कीं आंत बाहेर उडे गुलाल
(रंगात वृत्ती अनुरक्त त्यांची
तो बोलला 'धन्य असे स्त्रियांची)
रंगेल रंगे मग वृत्ति रंगीं
तो सामना होय पुढें दुरंगी

किती ती ताणूनी भ्रुकुटि वर संधान करिते
किती जोडी सोडी शरधि हृदयांतून वर ते
शिक्षणाच्या वक्षांतरिं विवर मार्गें शिरतसे
असा दिव्यें तेजें मशिन विजयिनीतीर स्फुरतसे

---

पृष्ठ क्रमांक ६८
लिहून क्रॉस केलेले
पुढील मजकूर रिअरेंज केलेला आहे !

पृष्ठ क्रमांक ६९

# अर्ज़ (२)

ढुंगणाला फोड झाला (ताबेदारा) खाकसारा चालवे ना हाल होती सांगवेना हालवे ना हासवेना
यावया टांग्यातुनीही मी कसाला* फार केला
सीट बोचे, दर्द वाढे,कांहिं केल्या तें जमेना
ढुंगणाची एक बाजू टेकुनी मी नीट बैसे
तोंड वेडें वांकडे तें होय सूधे ठेववे ना
काय झालें, काय झालें दोस्त जो तो हे विचारी सांगण्याला लाज वाटे (टीर फाटे) फाटे बोलवेना
शेवटी त्रासून केला रद्द माझा मी इरादा
मी घरी आलो, तरीही लेटवेना टेकवेना
लेखन नात
(लेखणी तस्वीर काढी काय माझ्या हालतीची)

लेखणी हीं काय काढी चित्र माझ्या हालतीचे
तकलिफीची इन्तहा झाली मुळी ही बोलवेना
फर्ज माझा मन्सबी मुस्तैद आहे मी कराया
आज लाचारी; कचेरीला मुळीं हो येववे ना
एक योमाची* रजा मंजूर व्हावी इत्तफाकी
अर्ज़ हा जाहा लिहाज़ा पेश आहे आजिज़ाना
*यौम,योम = दिन, दिवस

पृष्ठ क्रमांक ७०

ते पूर्ण रिकामा

पृष्ठ क्रमांक ७१

# (आईने एक नवीन लुगडे घेतल्यानंतर तिन्ही मुलींची उत्सुकता)

हे घेतले अग पहा लुगडे नवीन
थांबून येति सगळया बघुनी दुरून
नेसेन मी म्हणत एक, मिळे न कोणा
ते कां म्हणून! उडला दुसरा फुटाणा
तो आपले घराघरा फिरवीत डोळे
ठासून बाळ चिडूंनी चिडवीत बोले
माझी जुनी चीरगुटेच मला असू द्या
काही बरे मज नसो न बरी दिसू द्या
नेसा तुम्हीच सगळे अगदी नवीन
काही नको मुळे मला; मज द्या कुणी न
जा फाटकेंच तरि नेसूनि मी फिरेन
मागें कांहि नच काहि कुणा म्हणे न
आईस गोड तिसरी म्हणत्ये लहान
तूं ठेव हेंच लुगडे अपल्यास का न
जे नेहमी सकल घेशिं हवेंच यांला
देऊं नकोस अगदीं तरिं हें कुणाला!
(अत्यंत आग्रह करीत करीत गेली)
अत्यंत आग्रह करीत करीत गेली

पृष्ठ क्रमांक ७२
ठेविवले का दार मोकळ कळे मला न च हे
आहे कोणी आंत का न हो डोकावुनि पाहे

# सारे द्रव्य दिलें नृपा चुकवीला गेला न सारा जरी ।

सारे द्रव्य दिलें नृपा चुकवीला गेला न सारा जरी ।
कंठी प्राण मदीय फक्त उरले, घे घे हवे ते तरी ॥
सारा हा तुजला हवा, रडवूनी ने आपल्या लेंकरा ।
स्वार्थाला जुलुमी करें, नृपवरा गोळा करीं तूं करा ।
धेशी पांघरुणास व्यर्थ वरूनी किंवा न ठावें तुला ।
कीं (करिं) देतो हिसकावुनी स्व शिशुच्या हा घास तोंडांतला ॥
नाना लाव दिवे, नवे कर, कर तू ऐष आराम रे ।
अंधारांत तुझी प्रजा विवळुनी खालीं दिव्या च्या कडे ॥
ने ही माझ जमीन, पर्ण कुटि ही ने बैल रे पाटिला ।
ने ने हे फिरवून नांगर घरा दारा वरीं; ने मला ।
काहीही ने पण राहुदे धनिणीच्या आंगावरी दागिने ।
प्रेमाच्या मम ज्या खुणा निज करें मी घातले हो हौशीनें '
घ्या घ्या मोहनमाळ नाथ नथ ही कंठांतली हीं सरी ।
बाळें व्याकुळ आपलीं मुळिं नसे खायास कांहीं घरी ॥
सोन्याची जगिं ची काय अपल्या या दिव्य सोन्यां पुढें
देवाच्या घरि न्याय कांहि च नसे व्हावे कसे हो पुढे ॥
गेलें खोल दरींत दीड वितिच्या जें तूं दिलें तें प्रिये ।
आता आणखि आण' 'आण तुमची कांहींच देता नये' ।
'येथे मी किति हिंड हिंडत असे पुण्याकशी ही पुरी
जाळाया उदरांस कांहिना मिळे, आली फजिती पुरी ॥
(अंधारांत उदास काल फिरतां)
मी रात्रिं मार्गावरी
एकाएकिं महाल एक दिसला जो लक्ख अभ्यंतरीं
त्याचा दिव्य प्रकाश पाहुनि अहा आशा हंसे (फुले) मन्मनीं
वाटे जाइल तेथल्याच किरणें हृद्व्यापिनी यामिनी ॥
गेलो सन्निध तों प्रहार करिती तेथें पहारे करी

आले कानिं ' हटो पिटो ' मजगमे हे काय मारेकरी ?
त्यांचे लोचन लाल ; ते फिरविती, डोकें जणूं की फणा
वाटे रक्षक तक्षकांसम मला,  मी भक्ष्य त्यांचे म्हणा ॥
पृष्ठ क्रमांक ७४
वस्त्रें चित्र विचित्र घालुनि, तिथें सद्भूषणालंकृता
गाती नाचति नर्तकी उपवनीं, रंगबिरंगी लता (झाडांत जैशी लता)
तेथें सौख्य विलास एकवटलीं गुच्छांत पुष्पें जशी
नाना घालति किन्तु भीषण भुतें, थैमान मन्मानसीं ॥
झाले काय म्हणून आंतुन मला 'किं किं ' पुसे किङ्किणी
बोले गोड ; कठोर अंतरिं ; (पण) परी (तरी) बाहेर ये ना कुणी
अन्नाचा सुटला सुगंध करितो संतृप्त (नासापुटें) माझ्या मना
वाढे भूक परन्तु कांहि न मिळे, पोटास धक्क्या विना (खावया)॥
कांहीही मज ना मिळे पण कुठे भिक्षा न मागेन मी
किंवा दीन पणें कधीनं चरणा कोणाचिया मी नहीं
पाहीं तूं किरकोळ कांहिं मज दे बाळां तसे खावया
दे दे मंगलसूत्र, अन्य न जरी कांहीं असे द्यावया
माझे मंगलसूत्र मी न कधि दे, घ्या कंठा माझा चिरा
देई मी न जिवंत कंठमणि तें, माझ्या गळ्या चा हिरा
देवा ही मम अर्भकें !! न बघवे, डोळ मिटू दे मम
झाला निष्ठुर रुष्ट सत्वर तरी ; येवो अतां तो यम ॥
बोले तो 'विनवू नरास अथवा देवास दैवासवा
सांगा कोण समर्थ, वा कशि करू, सेवा मला दाखवा
कोणा आळवु मी, समाजधुरिणा, सांगा मला सत्वर, होतो स्वतां मी यम
अग्नी हा धुमसे अतां मम मनीं,०(कोंदाटला हा धुर (उर)) झालो अतां निर्मम

संसारातिल तीव्र ही विषमता, प्रत्यक्षकीं पाहतां
हा दावानल अंतरीं धधकला (भड़कला), शांती कशाची अता
पेटे हा वणवा करीत सगळें उद्ध्वस्त,हा अंतरी
काळें ठिक्कर चित्त हे दगड, कीं होय वज्रापरी
रे रे क्रूर विराट काळ पुरुषा दुष्टा समाजा तुला
देतो मी, जबडा तुझा पसर तूं,हा घास घे कोंवळा

हे माझे पहिले असे कुसुम जें प्रेमांत जोपासले
हे वेलीवर फूल मूल फुलले आतां हंसू लागले
त्याला निर्दय काय मी चुरमुळू फेंकू न देऊ अंतां

कीं टाक उपटून रोप अथवा माझेच मी स्वतां
घे घे ही प्रथमाहुती तवमुखीं कुंडांत मी अर्पिली ।

होवो शांत तुझी क्षुधा तरि अतां घे आमचे ह बळी
प्रेमाची उकळी मनोहर कळी वासंतिकी चारुता
किंवा निर्मल रम्य गाङ्गलहरी प्रत्यक्ष उत्फुल्लता
मुग्धा सुंदर बाळ पुष्प कळिका मत्स्फूर्ति वा भावना
जी दे दूदु म्हणे, न धार मिळते,
या खड्ग धारे विना
घेतो मी हिसकावुनी जननिच्या मांडी वरूनी (अंका वरूनी) हिला
घे घे घास द्वितीय तू जननिच्या डोळयांतल्या पी जला
किंकाळया तुज चारू गीत लहरी आनंदवो राक्षसा
ठेवी तूं उघडाआष तसाच जबडा, घे घास मोठा कसा

झंझावात सुरू तुफान उठले कल्पान्त झाला दैत्य ।
आहे निर्दय कर्णधार धरिं भी खड्ग (सुकाणु सह)
भोकें दोन उरी जिच्या तळांत पडली,नौकातळीं जातसे ।
जा मागें शिशुच्या प्रिये , त्वरित मी मागें, तुझ्या येतसे
(राही जो गिरि कन्दरांत xxx प्रच्छन्न रूपें पहा
स्वानन्दात निमग्न शांतिरत जो लावी xxx अहा
(बं बं बं) बों बों बों म्हणतो दिगम्बर असे दृष्टी जगन्मंगला
होवो शंकर मंगलप्रद तुम्हा कार्या करो मंगला)

लील्लोलास कला विलास जननी पीयूष निष्यन्दिनी
क्रीडा निर्झरिणी सरोज नयनी आनंदिनी मोहिनी
जी माझी हृदयेश्वरी मतिमती मत्स्फूर्तिची मूर्तिती
देतो मी अपल्या करें तवमुखीं घे ही तृतीयाहुती
माझें प्राण तसे निधान सगळे हें अर्पिलें राक्षसा
होई तृप्त खुशाल तू मार मिटक्या घे घास चौथा कसा
प्रेतें तीन इथें ; पहा नरक हें, वैकुंठ झाले घर
कुंभी पाकिं गभीर, लोट अधमा आता मला सत्त्वर
खड्गा, मी तुज घेतले निज करिं तेव्हां उडाली दया
कंठी मी तुज ठेवितो उडव हं तू त्याला अता निर्दया
घाली घाव प्रहार तू कर आतां पाषाण वक्षः स्थळीं
झालें ! सर्वहि संपलें बुडतसे संसार सारा तिथें ।
सारा अब्धि बुडे अशा चिमुकल्या लाटा मधें हो इथें
अंकीं चार समाप्त नाटक असे कोणी रडो वा हंसो ।
झालें ! शेवटचा पड़ेच पडदा, आम्ही रजा घेतसों ॥

# मध विकणारी

युवति पातलि सुंदर गुर्जरी ।
भरूनि ती मधु दोन घटान्तरीं ॥
म्हणतसे मधुघ्या मधुघ्या कुणी ।
मधु गळे जणुं कीं (वदनांतुनी) अधरातुनी ।। १।।
कुठुन सांठविला मधु ना कळे
तुज मिळे कुठलें अग मधु पोंवळें
उपवनीं मधु कुंज लतांतरीं ।
(मधु दिला तुज सांग कुणी तरी)
तुज मधु दिला (मिळे) कुणि सांग मला तरी ॥ २ ॥
(or
मधु मिळे तुज सांग कुठे तरी)
जमविला अथवा फिरूनी वनीं
सकल तूं मधु हा मधुहासिनी
विलसला सगळया शरिरान्तरीं
तव मनीं वचनीं मधु माधुरी ॥ ३ ॥
मधु कपोलिं तसा मधु मस्तकीं
नयन ही दिसती मधुमस्तकीं
रसरसे मधु हा अधरान्तरी
भरतसे हृदयीं कलशोदरीं ॥ ४ ॥
मधुकरी अथवा मधुमक्षिका
मधुमयी असशीं मधुबालिका
प्रथम भाव तुझा कळुं दे तरी
मग विचारिन मी अपल्या घरीं ॥ ५ ॥

# बाल - वेली

घालीन हार गजरे करूनी फुलांचे
घालोन सुंदर हि ईअररिंग त्यांचे
घालीन मी बकुळिची चमकी कुड्या ही
कीं सांखळ्या करूनि सुंदर तोरड्याही
बिंदी तसा बिजवरा (शिरिं ल्या) उलल्या कळयांचा
(गुंफा लहान वि परकार हि पाकळ्यांचा)
गुंफुन शाल वरूनी हिरव्या दलांची
मी पांघरीन ; मज हौस असे फुलांची
घालून या अति मनोहर दागिन्यांना
हातात घेऊनि कळया सुम गुच्छ नाना
वाटे मनीं उपवनीं सजुनी फिरावे
वाऱ्यासवें हंसत खेळत मी ही डुलावे

# वंङ्ग - अङ्गने (पुंगीवाली)

(म्हणति वङ्ग युवति जादुने जिवांस भारती)
वंङ्ग - अङ्गने,
थांब, थांब, हाय हाय !
कुणि दिसे न तुज सहाय ॥
करिशि घोर कर्म काय -
हर्षितमनें हनि सारे मम ॥ १ ॥
डुलत हा महाभुजङ्ग
उल्लसित तदन्तरङ्ग
उठति भावनातरङ्ग ॥ २ ॥
शुष्क पुङ्गि च्या मधून ।
अंतरङ्ग दे भरून ।
स्थिरचरांतरीं शिरून
भार जादुने
पुंज पुंगिनें ॥ ३ ॥
घुमव घुमव मस्तकांस
डोल डोलवी तयांस
कर सजीव तू मृतास
गोड गायनें
म्हणुनि भाव मंत्र गीत
फिरूनि मंडलाकृतीत
हो गुंग
खेळ नाच नाचवीत
    काय नाचणें !!!



फणी हले डुले झुले
झुला कुठे न पण कळे ?

(कुणी कुणास / स्थिर चरांस / उभयतांस) झुलविले
भाव लहरिनें
उंच उंच करूनि अंग
ताठ होतसे भुजंग
गान माधुरींत गुंग
फुल्ल लोचनें
उभय गुंग दंग निजकृतीत
गायनांत फूत्कृतींत
जवळ जवळ येत नाग
भरत हृदयिं फार राग
स्वतनु रक्षण्यास लाग
तू पलायनें
तूं हि खालि लवशि काय ?
नाग उंच होय हाय !!
पृष्ठ क्रमांक ८१
पुंगिला शिवे शिवाय
आपल्या फणें
सरकवी हळू च फणास
दे कळू न तो कुणास।
नाद उगम पाहण्यास
आपल्या फणें

ठेवि मधुर अधरिं वदन
विसरि गरल अमृत पिउन।
स्थिरून वृत्ति जाति विरून
मुग्ध लोचनें

पृष्ठ क्रमांक ८२

# Lines Written in Early Spring **BY William Wordsworth (1770-1850)**

I heard a thousand blended notes,
While in a grove I sate reclined,
In that sweet mood when pleasant thoughts
Bring sad thoughts to the mind.
To her fair works did Nature link
The human soul that through me ran;
And much it grieved my heart to think
What man has made of man.
Through primrose tufts, in that green bower,
The periwinkle trailed its wreaths;
And ’tis my faith that every flower
Enjoys the air it breathes.
The birds around me hopped and played,
Their thoughts I cannot measure:—

पृष्ठ क्रमांक ८३

# वसन्तागमानापूर्वी लिहिलिल्या ओळी

(विलियम वर्डस्वर्थ 1770-1850)
विश्रान्तीस बसें मनोहर लता कुंजांत मी हर्षुनी (आनंदुनी) ।
आले कर्णपुटा वरी विविध तैं संमिश्र मंजुध्वनी ॥
तेव्हां मानसिं रम्यवृत्ति स्फुरली,त्या जागल्या भावना ।
ज्यानें चारू विचार फार करिती, उद्विग्न माझ्या मना ।
जी कार्ये घडवी निसर्ग रमणी, किंवा सुरम्या कृती ॥
माझ्या तेथेंआंतर जीवनास करित्ये, संलग्न त्यांच्याशिती ।
झालों खिन्न बघून ही स्थिति अशी, नैसर्गिकी ही जरी ॥
केली कां मग मानवें अशि दशा, ही मानवाची तरी ।
मालाकार कशी लता पसरली, ही नील पुष्पी पहा
आलिङ्गी तरु पुंज तीस हिख्या, त्या मंडपीं तो अहा
वाऱ्याची रिझवी (निवावी) झुळूक कुसुमा, विश्वास माझा असे
ते निःसंशय हर्ष निर्भर डुले, निःश्वास घे तां हंसे ॥ ३ ॥
माझ्या भोंवति पक्षि वृंदे उडती, ते खेळती नाचती ।
त्यांच्या कांहिच कल्पना न कळती, ही गुंगते (भांबावते) मन्मती ॥

पृष्ठ क्रमांक ८४ physically not numbered may be skipped from enumeration
पृष्ठ क्रमांक ८६
But the least motion which they made
It seemed a thrill of pleasure.

The budding twigs spread out their fan,
To catch the breezy air;
And I must think, do all I can,
That there was pleasure there.

If this belief from heaven be sent,
If such be Nature’s holy plan,
Have I not reason to lament
What man has made of man?

पृष्ठ क्रमांक ८५
त्यांची अल्प हि हालचाल सुचवी आनंद वृत्तींतला।
माझी वृत्ति हि पाहुनी सहजतें झाली तरंगा कुला॥

शाखा कोमल आपल्या पसरती, पानांस पंख्यापरी।
(वारामन्द करांगुलींत धरण्या तद्यत्न चाले तरी)
चाले यत्न करांगुलींत धरण्या वाऱ्यास त्यांचा तरी।

कांहींही म्हटले मनीं तरि असा, विश्वास वाटे मना
त्यांच्या अंतारिं प्रेम सात्विक वसे, आनंद सत्कल्पना (सद्भावना)

अंतःस्फूर्ति अमानुषी, प्रगटवी विश्वास ऐसा जरी
किंवा ही विमला निसर्ग रचना, आहे अशी ही खरी

व्हावी कां न तरी सकारण तदा, उद्विग्न (निर्विण्ण) माझी मती।
जेव्हां मानव मानवास (निज करें / जरि स्वतां), संपादितो दुःस्थिती॥ ६॥

पृष्ठ क्रमांक ८७

# त्रिशिंग राव

केव्हांचा ब.. (हाका मारि त मी असे किति तरी पाणी न आणि कुणी,
केव्हांचा मी हाक मारितो पाणी आणा कुणी
(वाटे की तुज खोकलो...)
सोडु नका ही रीत आपली जुनी...

अपुर्ण
पृष्ठ क्रमांक ८८ to ९१ missing from centre binding staple

पृष्ठ क्रमांक ९२

# गरिबाची कावड

(बाळ माझी ही अजूनही का न आली)

दुरुन बघते निज बालिकेस आई
जननी नयनी जल भरुनि भरुनि येई

परकराचें खोंवुनी उंच ओचे
बाळ पाणी आणीतसे नदीचे

घेइ घागर कंबरेवरी मोठी
बहिण बसली जणुं कडेवरी छोटी ॥ १ ॥

गळयामध्ये घालीत हात तीच्या
तीहि खुळ,खुळ बोलते गोड (बाळ) वाचा

खालिं उजवा तो लोंबकळे हात
(घेई भरलेली कळशी एक त्यांत)
भरुनि कळशी ती घेई एक त्यात

केश कुरळे विस्कटति ते कपाळीं
पुसट कुंकू ते दिसत तिच्या भाळीं

मधुनि सूं सूं ती करित जाय बाला
चाल चाले जणुं काय धरुनि ताला ॥ २ ॥

जोर उजव्या पावलावरी देई
हळूच डावा ती पाय पुढे (ठेवी) नेई

तोल संभाळून पाय वाट चाले
दोन्हि बाजूस ती डुलू डुलू कावडी परीहाले
(सारखी बाळ हाले) ॥ ४ ॥

माय म्हणते मनिं वेळ फार झाली ।
परत अजुनी कां बाळ नाहिआली ॥

दुरून बघुनी निज बालीकेस आई ।
जननि नयनीं जल भरुनि भरुनि येई॥ ५ ॥

पृष्ठ क्रमांक ९३
Blank

# सोड मार्ग सोड च बाळे

सोड मार्ग मम सोड च बाळे

सोड आपले तेंदरचाळे$टीप:$. तेंदरचाळे' हा शब्द प्रामुख्याने ग्रामीण किंवा अनौपचारिक मराठी भाषेत वापरला जातो.मुख्य अर्थ:लहान मुलांचे किंवा एखाद्या व्यक्तीचे 'लाडिकपणा', 'हट्ट', 'नखरे', 'बावळटपणा' किंवा 'अतिचंचलपणा' दर्शवण्यासाठी हा शब्द वापरला जातो.संदर्भ आणि उपयोग:लहान मुलांसाठी: एखादे लहान मूल खूप लाड करत असेल, सारखे हट्ट करत असेल किंवा लहान मुलांसारखे निष्पाप चाळे करत असेल, तेव्हा त्याला 'तेंदरचाळे' किंवा 'तेंदरं' करणे म्हणतात.इतर व्यक्तींसाठी: जर एखादी मोठी व्यक्ती लहान मुलांसारखे नखरे करत असेल, तर उपरोधाने (taunt) हे वाक्य वापरले जाते.हा शब्द प्रामुख्याने चेष्टेच्या किंवा बोलण्याच्या ओघात वापरला जातो.

काय जण तुजला काय वाटे
जाऊं दे मज आपल्या वाटे
उगीच पेरिशि येथे काटे
(उगीच पेरीशी येथे काटे)
काय जणं (भलतं) तुझ्या हे चित्तीं आले

अडवुनि धरिशी मज वळवाया
सांगशि कशि न मज उलटें जाया
(सांगशी कशी मज उलटे जाया)
लागशि भलते मज कळवाया
वाटेनें मी अपल्या चाले ॥ २ ॥

कुठें बघितली नच ही रीति
चञ्चल अबलांची ही प्रीति
उफराटी खरि त्या कुलटा करिती नीती
उलटें काळिज दिसते बाळे

बघ बघ माझ्या भगव्या वेषा.
बघतां ये ना तुझ आवेशा
आई माझी भोगी क्लेशा
उठले आंतुन ध्वनी निराळे

पृष्ठ क्रमांक ९५

उघड उघड तूं अपल्या नयना
भिन्नभिन्न या प्रलोभनांना
व्यर्थ पसरशी मम पथिं नाना
अढळपदावर मम मन जडलें

पृथ्वीवरल्या कल्पनेला
सुंदरतेच्या मूर्त कलेला
काय करूं मी सुगंधि झेला
माझे ध्येय च असे निराळे

तूं ये माझ्या मागें मागे
हेच तुला मी भगिनी मागे
तुझिया संगें तव अनुरागें
होवो उज्ज्वल जीवन सगळें

पृष्ठ क्रमांक ९६

# रडवितो बघ मी तुज ताइ  ग

'कितिहि तूं कर यत्न न मी रडें
तुज हवें तितुकें वद वांकडे'
'उगीच ताइ तुझी बघ ऐट ही
चिडशि लौकर तूं रडशील ही' ॥

'करुनि मी मन घट्ट इथें बसे
कर सुरू मज बोल हवें तसे'
'हिरकणी मुलगी पहिली जशी
बघितली न कुठें दुसरी तशी

किति मनोहर सुंदर बालिका
अधार पल्लव कोमल नासिका
 किति तिचा अति गोड म्हणूं गळा
 म्हणत मंजुळ गायन कोकिळा ॥
निवडता गहू तू हळू येत अशी

 तुरु तुरू फिरणें पथिं चालणें
चुरुचुरू वदणें किति वळुनी मग बोलणें
 गुलु गुलू किति गोष्टिहि सांगणे
मधुर सर्व मनोहर पाहणें

पृष्ठ क्रमांक ९७

(मधुर सर्व तिच्या कृती पाहणे)
म्हणती सर्व अति मनोहर सर्व करी म्हणे
 कितीतरी अमचा तिजला लळा
 पडत असे किती तरी अमच्या किति ती गळा
(सकल आठवतां मज) भडभडे उर आठवणीमुळें ।

पृष्ठ क्रमांक ९८

# काय झोपणे गडे

काय झोपणे गडे काय मी !!! हांका मारिलें
काय? येउ मी क्षणांत काम सोडुनी घरांत काय वाटलें मनांत
मज न तें कळे.
आंवरून सांवरून
पांघरूण हे वरून
घेतलेच गुरगुटून
कोण झोपले

वाटलें मला उगीच
झोंप लागली खरीच
 झोंप ही असे बरीच
काय घोरणें

मी अशी इथें बसेन
अशी मुळीं न मी फसेन
कां हि ही जरी म्हणेन
इथुन मुळि न मी हलेन
ढोंग पाहते

अधिक घोरुनी खुशाल
फेंकितेच दूर शाल
फसवितां ! स्वतां फसाल
काय पाहणे !

पृष्ठ क्रमांक ९९ a

# प्रगटली नुकती जगतीं कळी

 उललि एक नसे तरी मुळिं पाकळी
 खरंच का तुज हाच हवा बळी
 इतर कांहि रुचेल नका मुळी

तुज जगज्जननी म्हणती जन
परमकारुणिके करुणा घन
निरपराध मनोहर कन्यका!!!
तुझ हवा न बळी मुळि अन्य का
बघ कशी हंसते बघुनी तुला
विकसती वदनीं शशिच्या कला
तिज कशास हवी तलवार ही
मुळिं नको तिज एकहि वारही
तिज पुरे अंगठा तशि तर्जनी
ग्रसत राहु जसा गगनाङ्गणीं
नरडिला नख किंबहुना पुरे
गळुन जाइल जीवन तें नुरे
(अमृत बिन्दु लहान घटीं नुरे)

अमृत हे भरले जननी स्वतां
करी हवा तर तूं घट हारितां
परत घेशि अकारण हें कसें
जगतिं ही अपकीर्ति तुझी असे

पृष्ठ क्रमांक ९९ b
blank
पृष्ठ क्रमांक ९९
blank

(प्रसंग:A Case of Still born baby ‘s delivery)

# झाला चित्तीं भ्रम मधुनि कीं बाळ हे होय जागे

झाला चित्तीं भ्रम मधुनि कीं बाळ हे होय जागे
केव्हां वाटे मधुनि मधुनी श्वास ही चालुं लागे
वाटे आतां हळु हळु जणूं बाळ लागे रडाया
हाताचा मी मग सुरु करी पाळणा हालवाया
हा हा कैशा मज फसविती कल्पना भावना या
वाटे मध्यें विविध असले खेळकीं खेळती त्या
आलो आम्हीं सकल नदिच्या पुण्यतीरीं क्षणांत
ठेवाया मद्हृदय निधि ला भूमी अंतस्तलांत ॥ २ ॥

भूमाते तू उघड अपल्या खोल हृत्पेटिकेला
ठेवी यत्नें मम हिरकणी वत्सले बालिकेला
जीने नाहीं मुळिं बघितले भानुदीप प्रकाशा
बाला माझी पुनरपि करी मातृ गर्भ प्रवेशा ॥ ३ ॥

अंधाराच्या मधुन फिरुनी येतसे ही मदाशा
जाते आतां धुळित मिळुनी पावते कीं विनाशा ॥ ४ ॥

जन्मा आली मुकुल नयना भाग्य हीना अधन्या
कन्येला या बघति न कुणी तीहि पाही न अन्या

पाहू पाहू म्हणुनि म्हणती भोंवतीं मित्रपंक्ती
काढा काढा वरुन, शिशुला पाहुं द्या ही विनंती
अत्युत्कण्ठा त बघण्या बहिण बघण्या (बाळ/ चारू/) इंदु प्रभेची
पाहू कांती क्षण अभिनवा चंद्रिकेची विजेची

नाहीं, नाहीं, बघिन नच मी बालिकेच्या मुखाला
मित्रांनो तद्वदन अथवा पाहुं दे ना कुणाला

पृष्ठ क्रमांक १०१

न्यावें किंवा तरि तुम्हि तिला दूर मद्दृष्टि आड
झांको माझा नयन विषय प्रान्त सच्छाय झाड ॥ ६ ॥

मित्रांनों भू खणुनि खणुनी खोल हें रत्न ठेवा।

कोणी नेवो उकरुनि न हा आपला गुप्त ठेवा॥
दृष्टी फेंका जमलि कितिहीं भोंवताली गिधाडें।
काढिती जीं खणुनि तनुच्या अस्थिचे भव्य वाडे ||
दाटी तैशी वरदळ किती उज्जनीच्या घरांत।
जा गा तेथें नच निजविण्या निज अर्भकाला निवांत॥
पृथ्वी अंकीं म्हणुनि निज तू ठेवीतों मी क्षणांत।
दिग्देवीं नो सतत असु द्या दक्षता रक्षणांत॥.

# दुडु दुडु दुडु दुडु इन्दु आली

झबले घाली  वेणी घाली
दुडु दुडु दुडु दुडु इन्दु आली
 चुरु चुरु चुरु चुरु बोलुं लागली
न्हांऊ न्हाऊन माझी झाली
झबले घाली  वेणी घाली
 सुंदर सुंदर परकर नवा नेसली
कुंकू लावुनि बघा कपाळीं
दादा घ्या ही इंदू आली
. गोरी गोरी नवी जाहली

टीप: Originally बोबडे बोल कवितेत आहे, इथे बदलून व्यवस्थित केले आहेत.

पृष्ठ क्रमांक १०३

देवा स्वर्ग नको, नसे जर चहा तेथे, सिनेमा तसा
नाहीं नाटक रेडिओ, न गमती विश्राम व्हावा कसा
(राहावे म्हणती पिऊन अमृता मिष्टान्ना कांही नसे)
घोड्याच्या नच शर्यती, न गमती, अंडीं न ब्रँडी तशी
(वायू भक्षण पान -पान) मिष्टान्नें, अनेक सुधा तृषा पिऊन अमृता भागेल सांगा कशी?? ,

पृष्ठ क्रमांक १०४

Blank

# साभार स्वीकृती

१३.०४. १९३३

श्रीयुत गीतात्मज - यशवंत सखाराम नाशिककर, देवास यांस समर्पित

(प्या प्या किती तरि न जो कधिही रिकामा
पीतां बरोबर मुळीं सुचुं दे न कामा
पेला अपूर्व अपला मजला मिळाला
देतां न ये कधिहि मोबदला कुणाला)
आधींच गोड रस -संयुत काव्य पान
त्याच्या वरी गुरु प्रभु यशो -गुण -गर्भ गान
जेव्हां अहा प्रभु - यशा यशवंत गाती
व्हावी न कां मग तरङ्गित चित्त वृत्ती
झालों पिऊन अमृता किति
(दत्तामृत करुनि स्वीकृत) मी कृतज्ञ
कांहींतरी लिहुन काव्यकलानभिज्ञ
(दत्तामृता पिउनि मी अपला कृतज्ञ
होऊं कसा उत्रृण काव्य कला अनभिज्ञ)
त्या पाठवी जुळवुनी पद पंक्ति भावें
द्यावें मनीं स्थळ तयांस महानुभावें
देतो कुणी जरि अपूर्व सुधा-रसाला
ज्याची नसे मधुरता वसुधा -रसांला
त्याला अकिंचन कुणी कवि रामनामा
देईल काय विभवें पुरता सुदामा
(भानु प्रभा गगनमंडलिं ती विकासे
नीरांजनी परि मम प्रतिभा प्रकाशे
ओंवाळुनी द्युति निधी वरुनी तनुला
सारूप्यता अभिनवा तिजला मिळाली)

# (हात)रूमाल

मुद्दाम ती काढुन काम काहीं
 उगीच येऊन उभीच राही!
 बाजूस चारी करि, पाहिले से
खोलींत कांहींतरि, राहिले से

 उगीच लागे नख खावयाला
उगीच बोटें मग मोडण्याला
 खणी पदाचा अंगठा जमीन
 (डोळे कला दाविति त्या नवीन)
डोळयांत चाळे दिसती नवीन
 तिचे तिला काय हवे कळेना
कांही मिळेना तिज सांपडेना
 बाहेर जाई; न निघेच पाय

(बोलाविले हो मज आंत काय?)
बोले मला बोलाविले काय?
 ती आंत बाहेर फिरे कशाला
 ठाऊक नाही न तिला कुणाला
 अत्यंत दोलाचल चित्त वृत्ति
 (झुल्यावरी डोलत चित्तवृत्ति)
कळे न कोणास मन: प्रवृत्ति

पृष्ठ क्रमांक १०७

खुंट्या स सोडी न नवीन धेनू
फिरे तशी पार्थिव (सुंदर) काम धेनू
(तशी फिरे ती घरिं कामधेनू)
अत्यंत तें सूक्ष्म अलक्ष्य दावें
स्वरूप त्याचे कुणी हो वदावें
गेली न गेली परतून आली
धुंडावया सर्वहि तीच खोली
आता तिचा हारविल रुमाल
(खोलींत सारें जणु सांपडेल)

दृष्टींत सांगू किति बारकाई
पाही चहूं बाजु मुळीं न कांहिं घाई

मुळे नाही घाई
पुन्हां पुन्हां दृष्टि वळे जिथें तो
कोणा, अहा भाव कसा कळें तो
बोले 'कपाटें हुडकून पेट्या
मी पाहिल्या सर्व घरांत खुंट्या
रुमाल कोठें पण सांपडेना
कां चोरला कोणि मला कळेना

पृष्ठ क्रमांक १०८
बोले पुढे ती हृदयैक राया
थट्टा हवी थोडिच कीं कराया
वस्तू किती सांपडल्या पलंगीं
माझ्या इथें वस्तु किती मिळाल्या
यावा न कां संशय अंतरंगीं

दोन्हीं खिसे पाहुनि पोलक्याचे
कीं कोट पॅंटातिल सर्व साचे
आंगातला शर्ट पहावयाचा
(हा राहिला तो मज दावयाचा)
आतां गडे तो मज दावयाचा

पृष्ठ क्रमांक १०९ ११०

Blank

पृष्ठ क्रमांक १११

(मुलींच्या परीक्षेत निरीक्षक असताना)

# साऱ्या सुकुमार मुली

साऱ्या सुकुमार मुली किती कलिका सदृक्षा
त्यांची तशात दिसते
त्या द्यावयास बसल्या प्रथमा परीक्षा
(प्रश्नांतल्या विषयिं (मग्न) / व्यग्र विचार त्यांचे)

प्रश्नाविना विषय अन्य सुचेना त्यांना
साम्राज्य येथ कसले मृदू भावनांना!!

येथें असें मम लहान वडील कन्या
तीच्या परी मजबरोबरीच्या अन्या

त्यांच्यात एक विधवा रमणीय बाला
ना पहावे तदिय कुंकुमहीन भाला

'बेवा' लिहीत अपल्यास अभागिनी ती
वाचून ते कुटिल वाटत दैवनीती

धर्मातला जणुं सनातन हा अधर्म
ठावे तिला न कसलें असते कुंकुम
ऐसें कसेच शुभमंगल सावधान

ती हक्कदार नुसती पति आडनांवा
ती पारखी स्वपतिच्या नवप्रेम भावा

झाले मुहूर्तिं शुभमंगल सावधान
ऐसें कसेच शुभमंगल सावधान

त्या वेळीं कां न फुटले
तेव्हा तिचे न फुटले कां न कान
होते बरे जरी तिचे फोटो तेच कान

आता नशीब फुटले कुणी न विचारी
तोंडी तिला म्हणति किति गरीब असे बिचारी

पृष्ठ क्रमांक ११२

आलो किती हि थकुनी जरि मी घरांत
किंवा म्हणा उपवनीं अप.....

अपूर्ण
पृष्ठ क्रमांक ११३

# प्रभात

अनंत हस्तें निज तेज मला
सहस्त्र रश्मी उधळीत आला
सारें मनो मंदिर भावनांचें
झालें प्रभा संयुत पावनांचे
कोणी प्रभूच्या भजनांत गुंग
कोणी चहा बिस्कीट पान दंग
कोठें जिभा चालति सासवांच्या
तै आसवांच्या सरिता सुनांच्या
कोणी म्हणे वृद्ध हरे मुरारे
देवा असा तू निजलास का रे
नको प्रभो हाल, नको अपेक्षा
न चाळवी व्यर्थ करी न चेष्टा
(हा) संताप आंतून जिवास जाळी
हा खोकला दावि कला निराळी
प्राणास न्याया नवि काढी रीत
टांकी घशा आंत सुरू करीत
पृष्ठ क्रमांक ११४
हा श्वास टाकी जणुं लांब पाय
मागें न येवो पण येत हाय
नाकांतली तो करि साफ वाट
(प्राणास रोकी कफ किन्तु दाट)
रोकी गळयाला कफ किन्तु दाट
आंगी कळा कीं चमका निघाल्या
तारा शरीरीं जणुं चालु झाल्या
धाडीत संदेश यमास मी
तारा यमा पाठवि रात्रिं मी (?)
येई न तो काय करुं प्रभू मी (?)

होऊन कीं पातळ आंत दाह
नाड्यांतुनी वाहति तत्प्रवाह
साऱ्या शरीरांत सरासराहें
व्यापून केंद्रीं, स्थिर दुःख राहे
येई मला झोंप न वेदनांनीं
प्रसन्न हो दीन निवेदनांनीं
तू ऊठ देवा उठवी मला ही
ने आपल्या सन्निध ऐंक कांहीं
पृष्ठ क्रमांक ११५
हा क्षीण झाला पिंजरा जरे नें
दारें दहा हीं झिजलीं क्रमाने
ना सांपडे वाट तरी उडाया
हा घाबरे पोपट उंच जाया
(ह्याच्यानंतर
'आश्लेषकंठा तील etc)

च्या प्यां ध्वनी होय घरा घरांत
च्यूं च्यूं हि चाले तरु घरट्यांत
वत्सास माडींवरि घेति आई
गोठ्यांत पाजीति प्रफुल्ल गाई
धेनू चराया मग जाति राना
बाया घरीं बांधिति कंबरांना
काढावया केर स्वतां घरांत
घेती कुणी केरसुणी करांत
घेऊन डोक्यावर घागरींना
कडेवरी घेति त्या मुला मुलींना
मार्गांत रांगा गजगामिनींच्या
पृष्ठ क्रमांक. ११६
पाण्यास जाती कुच कुंभिनींच्या

किती कामिनींच्या
 गोष्टी किती चालति चालतांना
 सीमा न त्यांच्या मुळिं भाषणांना
 आडावरी गोल सभा भरे ती
 पंचायती सर्व सभेंत होती
येथेंच स्वातंत्र्य कुरापतींना
 लागे पुसावे न पतींना
 तसे न सासूस न सासऱ्याला
 कुणाहि मोठ्या पण जणुं माणसाला
 भाड्यांस भांड मग लागु लागे
 भांड्याच भांड मग लागू लागे
 भांडवया वेळ स्त्रियां न लागे
वादाविवादावर हात वारे
पट्टे मुखाचे सुटतात सारे
केंस मग विस्कटले कुणाचे
वेणी सुटे प्रगट तांडव लोचनांचे
पृष्ठ क्रमांक ११७
 फोंफाविती दुरुन नागिणी चेंव आला
 कीं आपटीति जणुं वाघिणि शेपटींला
 त्या मांजरी सदृश लागति गुरगुराया
गर्जून एकदम लागति कीं उडाया
 अंङ्गांग ही मदत दे उसळे लढाया
 कीं काय काय स्तन लागति ते म्हणाया
भ्रूत्पक्ष्म पंक्ति सुरु नाकपुड्या स्फुराया
झाल्या सुसज्ज निज पक्षीय वीर बाया
 कीं वीरता विविध मूर्ति धरून आली
 स्वर्गांतुनी उतरले पितरांदि खाली
 नाचे जिभेवर सरस्वति अङ्गनांच्या
धो धो प्रवाहित नद्या मुखि वाङ्ग्मयाच्या

ज्याच्या पुढे न टिकता मुळि मोठे मोठे
वाटे मना अबल या अबलाच खोटे
वाग्बाण ते सरसरा सुटतति तेजे
स्वर्गांत पाहुन धनुर्धर पार्थ लाजे
त्यांची तशी चप्पलता बघुनि करांची
त्याला गमे उगिच आपण सव्यसाची
त्वरें रमणिंची वाहें त्वरान्वित रयें
(वाहे सुशीघ्र रमणीय रमणीय वाणी)
अत्यंत संस्कृत गिरा जणुं देव वाणी
सांगा पळीं गति किती गणितीच कोणी
पृष्ठ क्रमांक. ११८
(येथे कंसात एक अन्य कविता होती,ती पुढील पृष्ठ क्रमांक १२० संपल्यावर दिली आहे!)

पाहून दिव्य अबला कर लाघवाला
वाटे विचित्र मनिं भार्गव राघवाला
तोंफातुनी उभय पक्षि ही धूम धडाका
भांडीही ढासळलि जों उडला भडाका

आल्यास सुसन्निध पुढें करुनी करांला
कुस्ती सुरू, युवति दृष्टि दिसे कराला
झिंज्या धरून ;करिती नवगर्जनांला
तोंडांत संस्कृत पदावलि तर्जनाला

कोठे मनोहर त्रिवेणिं सुसंगमानें
झाली पवित्र ममदृष्टि निमज्जनानें
विद्युत घनावलि मधें तळपे नभांत
तोंडीं तशी चमकते चपला मुखांत
होतां कडाकड पुढे अवसान गेले
वृष्टींत वांछित सुपर्यवसान झाले

पर्जन्य थांबुनि पुढे पसरे प्रशांती
तोंडांवरील लपली रमणीय कांति
पहावया दुरुन कीं लिहिण्यास सौम्या गम्या
ऐकावया तशिच युद्ध कथा सुरम्या
पृष्ठ क्रमांक. ११९
साऱ्या खऱ्या त्या सगळयाच भोळया
क्विनिन् परीसाखर गोड गोळया (शुगरकोट)
पाणी विहिरींतुन काढतांना
डोळयांत आलें मग (भांडतांना) बोलतांना
पुन्हां पुन्हां नेत्र भरून येती
कुंभावरी कुंभ भरून घेती
जातां कधीं कुंभ पयोद हाले

पाणी पडे होय शरीर ओलें
कीं कुंभ मानूं
कीं हा अकस्मात् घन कृष्ण आला
गोपी धरा पाझरवी तयाला
हळू हळू थेंब वरून टाकी
पाणी नदीच्या उडवी तटाकीं
पाऊस झिम् झिम् पडतो वरून
पृथ्वी तनू भाग दिसे खुलून
वस्त्रांत तीच्या हिरव्या तृणाच्या
पाणी जिरे आंत धराधरांच्या
समुन्नतांगी कुचकुंभिनींच्या
विशेषतः रम्य नितंबीनीच्या
शरीर भूमीवरची अशेषा
पृष्ठ क्रमांक. १२०
तशी दिसे सुंदर रूपरेषा
शरीर यष्टी युवती जनांची
बारीकही सिंह कटी तयांची
त्यांचा चुकू तोल न की म्हणूनी
हीं पारडीं बाजुस तुल्य दोन्हीं
डौलांत जाति डुलती जणुं कावडीशी
ही कविता संपली,
अजून एक वेगळी कविता
(माझे पाचन हे असे बिघडले काही मला न पचे कोणी काही मला म्हणे सहनही तेही मला नरूचे पाही मी नयनास तानुनी काही मला नादी से आहेस आहे सत्य कळेना काय लपले कुठे ते सांगा कुठे ते वसे)
ही कविता संपली,
अजून एक वेगळी कविता
पृष्ठ क्रमांक ११८ वरुन येथे दिली आहे, वरील मुख्य कवितेत कंसात () होती
(या जगांत कांहिं नाहिं व्यर्थ काय वाचुनी
सांगणार सांगतात

ऐकणार ऐकतात
मागणार मागतात
जन्म प्रेम बंधनीं)
कोणि कृष्ण चरणकंज, ध्याति मुखर मधुप पुञ्ज
करुनि संत संग दंग, कृष्ण कृष्ण ध्याउनी)
पृष्ठ क्रमांक. १२१

Blank
पृष्ठ क्रमांक १२२

# नाना आणि मनी

गेली कशी स्वजननी मज सांगतांना
हें ऐकतां गंहिवरे अति बाप 'नाना'
जाऊन बाळ तिज जाहलि दोन वर्षें
तैं सोडिलें घर तसें मम चित्त हर्षें ||१||
एके दिनीं हट्ट धरी मनीं ती
नाना मनीं काहुर माजवीती
आई कसें ही करुनीच आणा
नानास कांहीं मुळिं बोलवेना ||२||
ह्या भारतांत बघतां विधवा दशा ही
बाळू कसें कळवळें मम चित्त पाही
देशांत बाल विधवा दिसती कशा ह्या
देवोत जे सदय ते तरुणींस साह्या ||३||
\वाली नसे जगति त्या कुणिं बायकाचा
होतो प्रहार वरि वाङ्ग्मय सायकांचा* *सायकांचा= शर,बाण,तीर यांचा
मानीत बालविधवेस करंटि दुष्टा
'झाली कशी' म्हणति दुर्जन 'फार पुष्टा'. ||४||
पृष्ठ क्रमांक १२३
विद्वान अनेक जगिं मूर्ख च काय कारे
वाटे मला बडबडे कृति शून्य सारे
घालीन मी परि धडा वळवावयाला

लावीन मी वळण उन्नति व्हावयाला ||५||
अडचण बघ होते ही कशी आपणाला
किति दिवस असें हें जाहले सोसण्याला
सुरस मिळत नाहीं अन्न ही खावयाला
सकल घर गमें कीं येतसे खावयाला||६||
तळमळ मनिं कन्या पाहता मातृहीना
करि कधिं कुणि प्रेमें नित्य वेणी फणी ना
युवति हृदय आहे दुःख तप्तां विसावा
पतिस विरह स्त्रीचा वासुदेवा नसावा ||७||
झाले विषण्ण अतिखिन्न मनांत नाना
आले विचार बहु नैतिक भाव नाना
क्रीडांगण स्थळ दिसे मनभावनांचे
प्रक्षुब्धता हृदयिं दावि प्रभावनाचे ||८||
प्रक्षुब्ध मानसिक जमनि युद्ध जेव्हां
झालें प्रशान्त; शमली चल वृत्ति तेव्हां
पृष्ठ क्रमांक १२४
(कुणास बांधिशी जाशि घेउनी)
केलाच निश्चय मनांत पुनर्विवाहा
आई नवी मग मिळे मनिला अहा हा ||९||
झालें पुढें अतिप्रसन्न मनांत नाना
गाणें सुचे, ध्वनि निघे, तन तों तना ना
अभ्यास बोलति, करीन फिलॉसफीचा
एम.ए.करीन, नव्हता गजप्रश्न फीचा ||१०||
एके दिनीं, मनि पुढें वदली मनानें
'जी जागवी मज पटापट चुंबनानें-
मी झोंप घेत असतां किति छान गाई
आणा नका मग तुम्ही पण तीच आई ||११||

पृष्ठ क्रमांक १२५

# मधुमक्षिका

कशास उडशी अशी| (मक्षिके)
 स्थळिं स्थळीं बैसशी ||ध्रुवपद ||

पिशी परिस तूं अशी
 कशास मधु अग पिशी
फुला फुलांवर कशी ||२||

 म्हणति चावकी तुला
 निरस वाटती मला
खुशाल डस तूं मशी||३||

 मनात मधु सांठव
 सुमधु मधुमधुर गुंजारव
फुलां सोड मग कशी ||४||

 वनिं वनीं वण वणा
कशास बघशी कोणा
हिता न मुळिं जाणशी ||५||

हृदयिं फुलली फुलें
 मधुर गंध दरवळे
पृष्ठ क्रमांक १२६
खुशाल बस तूं कशी| मक्षिके  ||६||
विहार मम मानसीं
 सुखेंच करि तूं कशी
नको पाहुं मज कशी| मक्षिके| || ७||

पृष्ठ क्रमांक १२७

# सुनीत :देतां द्या निधी, हा परंतु फुटका माझा असे हा घट

देतां द्या निधी, हा परंतु फुटका माझा अतां (असे) हा घट
 झाला जर्जर जो अनेक सहुनी आघात वज्रापरी
आहे सर्व जसा तसाच असुंद्या कांहीं टिके तो तरी
 ठेवायास लहान वस्तुहि अता त्याच्यात हो दुर्घट
 गाड्याला भरल्या न भार म्हणती होतो सुपाचा खरें
आहे तो जर पूर्ण कीं खिळ खिळत त्याचेंच त्याला नको
 जें जें कांहि कसेंबसे मिळविलें
 त्यानें आजवरी किती जमविलें!
 लोकीं आतां न तो तें मुको
 ठेवा ही निधि आपला सुसमयीं अन्यास ध्याया बरें
होतो मन्मनिं एकदा तृषित मी, डोळे करी मी वरी
 तेव्हां कांहि घनावली न वळली, नैराश्य बाणे मनीं

हिंडे मी जगतांत भग्न हृदयें, कोठें पुसे ना कुणी
 ये ये घे म्हणती मला पण अतां ठेऊं कुठें मी तरी
जेव्हां जें जगतीं हवें न मिळतें जेव्हां नको तें मिळे
 संसारांतिल ही विचित्र महिमा कोणा कधी ना कळे
पृष्ठ क्रमांक १२८
कितितरी उठला तिज खोकला
सकल रात्रिं न झोप मुळीं तिला
 शशिकलेस अतां निजुं द्या तरी
 उचलुनी मग घ्याच कडेवरी
 हळूहळू हलवा हळुद्या झुला
 हळूहळू तशि गाणि म्हणातिला
 दिसतसे दिसतसे बाळ निशापति कारेशी
खिळतसे ममदृष्टि चकोरिशी
 पृष्ठ क्रमांक १२९

Blank
पृष्ठ क्रमांक १३०
निज निज निज निज रे| बाळा
 रक्षो तुजला सारे
 युनिक नर सुरदेवी
 प्रेमाची तुजवर पुरती त्यांची
 छाया पसरावी
उपमन्यू | ध्रुव (चिली या) अभिमन्यू
व्हावे खेळगडी अर्पो निजगुण ते
भीमाने| अंजनीच्या तनयानें
(तव तनु वज्रा चा)
उप....

अपूर्ण
पृष्ठ क्रमांक १३१

# पहिलं वाहिलं कार्य आपलं

पहिलं वाहिलं कार्य आपलं
हौशीने हो करा चांगलं ||(ध्रुवपद)

 लहान असतां बाबा गेले
 त्यांच्या प्रेमा मी आंचवलें
काकांनीं मज मोठें केलें
माझं सारं त्यांनी केलं ||२||

 माझ्या साऱ्या काकी गेल्या
 असमयिं काळाने त्या नेल्या
 (माझी क्षणात गेली)
माझी आई गगनांतरी ती भुर्र उडाली

तुळया सगळया असल्या उडल्या
माझं माहेर उघडं पडलं ||३||

आतां आत्या काका सारे
झाले मामाही म्हातारे
जाउनि त्यांना बोलावावे
जेवण त्यांचं करा मोकळं ||४||

माझ्या वेळीं ही टंचाई
म्हणाल आता कशास घाई
ठाउक सारी मज चतुराई
गोड बोलुनी मला भारलं ||५||

ऐकेना मी पण यावेळीं
लहान पणिं मी होते भोळी
माझी (मंडळि/) माणसं आणा सगळी
स्वतां पाहिजे जाऊन अणलं ||६||

लहान माझ्या चिमण्या बहिणी
लहान भाऊ दादा वहिनी
आणा त्यांना मुलिच्च्या लग्नीं
स्वतां पाहिजे जाउनि अणलं ||७||

डोळे पुरते मग डबडबले
शरीर रोमे सारे खचले
भाव मनांतिल ते खळवळले
उकळी फुटली उतू चाललं||८||

# कालिया मर्दन

२०  ऑगस्ट १९३३

(मनमोहन भगवान श्रीकृष्णाने यमुनेच्या डोहांत दुष्ट कालियास शासन करण्यास उडी मारल्यानं तटावरील चाललेल्या करूण-क्रंदनाचें चित्र या कवितेंत वर्णन करण्याचा प्रयत्न आहे)

लवकर येई मोहनराया
शिणविशि कशि अशि अपली काया
दुबळी दुःखी रडते आई
हंबरडा या फोडिंति गाई
मस्तक पिटितील व्रजवनिताही
संकटा डोहीं बुडशी वाया ||१||

सुदृढ पाश पडला तुजभंवती
सर्व मित्र तव बघ हळहळती
रडती पडती उन्मुख बघती
काय सोडिली सर्वहि माया ||२||

काळ काळिया वाढवि वेढे
दृढतर मोहन- बंधन वाढे
झाले शौकें तटिं जन वेडे
हाहाकार मग लागे व्हाया ||३||

वाटे वेडी त्यास बावळी
मूर्ति ठेंगणी दिसे सांवळी
कळे न महिमा परम आगळी
सत्यसत्त्वनिधि मोहनराया ||४||

पृष्ठ क्रमांक १३३

काळाचें वर पडलें झांकण
 आत्मतीजबळ प्रगटवि मोहन
 तटा तटा तुटुं लागे बंधन
 लागे प्रभुवर मग वर तळपाया ||५||

 प्रणतपाळ गरीबाचा वाली
 उडी मारितो मग बलशाली
 नमवुनि अरिचें मस्तक खालीं
 लागे थय थय थय नाचाया ||६||

बोलें मोहन आज्ञा वाणी
 कालिंदी परि काळे पाणी
 दिले (हवें) तुला घे काळे पाणी
 जा कर काळें तोंड कालिया ||७||

 भारत तट तो सोडूनि गेला
 जलनिधिंमध्यें निवास केला
 स्वतंत्र मोहन निज जनिं आला
 लागे मंजुल गीतें गाया ||८||

पृष्ठ क्रमांक १३४

यमुना अपली गतिहि विसरली
 तन्मयतेची लहर पसरली
 मोहन नादांतरिं मग विरली
 राम हि लागे त्यांत बुडाया ||९||

पृष्ठ क्रमांक १३५

Blank

# सूर्यग्रहण

२२ ऑगस्ट१९३३

(यातला व्यंग भाव वाचकांनीं लक्षांत आणावा (गांधीची मुक्ती))

पश्चिम दिग्भागांतुन कोणी डोकावुनि बघतो|
बिंब फळाला मारुति सम परि तो ग्रासाया (येतो) टपतो||

तेजें विलसेंल दिगंतरीं रवि लागे तळपाया|
येइ न येई उदयोन्मुख तों खल ये बांधाया(ग्रासाया)||

सहस्त्र कर तवकर बांधुनि कोणी विवश तुला कसे केलें|
तव मुखिं काळें फांसुनि स्वर्गिय तेज लया नेलें ||

डळमळलें सिंहासन द्युतिमय खालिं मुगुट पडला|
वैभव पुरतें सर्व लोपलेंव प्रभु अडकूनी तूं पडला||

सौभाग्याच्या तिलका देवा पूर्वेच्या नाथा|
काळवंडलें दिङ्गमुख दुर्मुखलिही भारत अवनी माता||

तुज पुण्यात्म्याल्या
व्हाइटपेपर वरची पसरे वर शाई काळीं|
हृदय उदधिच्या मंथनिं कीं विषश्यामलता आली||

दुःखी दुबळ्याचे हृदयानल धगधगले खाली|
धूरानें (त्या) कीं केली गगनी रविचर्याकाळी||

पृष्ठ क्रमांक १३७

(जनता पातकपुंज झांकि कीं तुज पुण्यात्म्याला)

भारत पातक पुंजें झांकिति जणुं पुण्यात्म्याला
भारत दुर्दैवीच्या दाविशि ठळक प्रतीकाला

(भर हे)

जगत केंद्र वा जगत्प्राण प्रभु उंच किती असशी
साह्या काय प्रभु हाय आम्ही हो द्यावें काय तुजशी

हृदयातिल या गंगा यमुना जल अंजलि घ्यावी

(गंगा यमुनां नयनांतिल जल अंजलि घ्यावी)

रक्ताक्षतयुत प्राणध्वनि तव मुक्ती व्हावी
राहुनि कारागृहीं प्रहर कर तेजोंनिधि सुटला

मङ्गल किरणीं भारतभालीं मुगुटनवा सजला

पृष्ठ क्रमांक १३८

चट्टा समाज शरिरास खरूज दद्रू
आहे खरोखर मनुष्य नितान्त कद्रू

पृष्ठ क्रमांक १३९

Blank
पृष्ठ क्रमांक १४०

# पाठराखण

(एक सहा वर्षाची मुलगी तुळशीचें व आपल्या जीजीचें लग्न झाल्यानंतर आपल्या आईस म्हणते)

आईस बाळ पुसतें दिनिं एक सांग
माझे अतां लगिन होइल काय का ग ?

चौरंग खालिं; वर बांधुन ऊस लाव
घ्यायास कां मज हवें मग एक नांव

बोले पुढें सरस मंजुळ बाळ वाणी
जिल्बी करंजि कर तूं मग तशि गोड फेणी

होईल काय मग लग्न तुझेंहि का ग
होतील थाट मग काय तुझेंहि सांग

जीजी परी मग घरीं नवरा तुलाही
नेईल काय? पण तू मग ने मलाही

ऐकून तें हंसुनि चुंबन घेउनी ती
बोले असे जननि प्रेमल भाव मूर्ती

हो, हो, अवश्य म्हणुनी मग बालिकेला
झेली तिला करतलीं जणुं पुष्प झेला

येऊन सस्मित म्हणे अपल्या पतीला
या पाठराखणीस घ्या अपल्या मुलीला

# शारदा दर्शन २६ सप्टेंबर १९३३

# मयूर वाहिनी

गेली तळाला अतां धूळ खालीं तळां स्वच्छ झालीं अता जळें योग्य प्याया
येईल वारा न पाऊस आतां सरींच्या शरांनीं कुणा त्रास द्याया

नि:शंक छत्री सोडून आतां चला धोतरा सोडुनी पाय घोळ
पंकज पाऊस पाण्यास किंवा भिण्याची नसे आज वाटेत वेळ ||१||

धांवोत वेगांत मोटारि टांगे अतां कोरडा मोकळा मार्ग झाला
मोटारि स्वर्गांतल्या मेघमालावरी बैसुनी कीं विजाही पळाल्या

अर्थात् अतां थांबल्या गर्जना त्या घनांच्या दलांच्या तशा बेडकांच्या
उत्कंठता चातकांच्या कुलांच्या तशा गर्जना थांबल्या बालकांच्या || २||

कीं थांबल्या अश्रुधारा नभाच्या धरेच्या अहा गोड संमीलनाच्या
जाती उदासीनता मेघपाशा तरंगायला वृत्ति ही
उत्फुल्ल हृन्मंडलांतून भव्या शरच्चंद्रिका अंबरांतून आली
झाली सुधाप्लाविता भूमि माता नवोर्मिंत संपूर्ण वृत्ती बुडाली|| ३||

कारागिरानें कुणी काय जाणें जणूं जोडीले फाटक्या अंबराला
झाला नव्या सारखा चांदवा हा निळा ताणुनी लाविला मंडपाला
कांहीं कुठें लागल्या दीप पङ्क्ती विजेच्या दिव्यांच्या परी चांदण्यांचा
विस्तारीलें पांढऱ्या चादरीला कुणी खालती निर्मला चांदण्याच्या ||४||

पृष्ठ क्रमांक १४२

(या कवितेत मयूर वाहिनी व वीणावादन करणाऱ्या श्री शारदेच्या मूर्तिचे रहस्य माझ्या कल्पनेप्रमाणें सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मोर सगळयांत सुंदर पक्षी आहे. त्याची मोजकी व डौलदार गति अथवा चाल एखाद्या तालबद्ध गीताच्या (वृत्तांच्या) चालीप्रमाणें आहे. त्यानें चित्र विचित्र रंगाची शब्दाची झूल घातली आहे आणि त्यांवर साक्षात् भावना मयी -रसमयी शारदा निळया आकाशावर असलेल्या शरच्चंद्रिके प्रमाणें विराजमान झाली आहे. ही मुख्य कल्पना आहे)

सारा पिसारा उभारुन ज्याने सुरू नाच केला असा मोर आला
डौलांत तो डोल डोले बघुनी दिशांच्या अहा देवता दंग झाल्या
डोळे हजारो तनूच्या वरी कीं जणूं घालितो रंगल्या शब्द जाला
तो मूर्ती मच्छंद वृत्तापरी कीं गती मोजकी दावि स्वच्छंद ताला ||५||

नाना पदन्यास कौशल्य दावी सदाधार रसाधारता वाङ्‌मयी भावनांला
साक्षात् रसाची जणूं मूर्ति देवी मयुरास त्या ती वरी वाहनाला
नीला नभाच्या वरी चंद्रिकेच्या परी शोभली उज्वला (वाजणूं) स्वर्ग गङ्‌गा
मोरावरी शारदा ती विराजे जगद् मंगला निर्मला कोमलाङ्‌गा ||६||

अत्यल्प रुपास येई धरुनी शिशुच्या मनीं दृष्टिकेंद्री भराया
प्रेमांत येऊन वात्सल्य गीतें अहा वाजवी लागली गोड गाया
हातांतल्या मंजुवीणे वरीती कलांच्या विलासांचिया लावी तारां
वीणेचिया हृत्स्थळा वाजवीतां उठे (घुमे,भरे) आंत झंकार माधुर्य धारा ||७||

पृष्ठ क्रमांक १४३

नादें भरी गूढ हृन्मंडला मुखीं सोड आई सुधा बिंदु धारा
एकत्र झालीं तुझी बालकें ही कृपा चंद्रिकेची क्षुधाया चकोरां

तुझ्या प्रसादें मुखांतून माझ्या अपूर्वा सदा काव्य पंक्ती निघाव्या
श्रोत्यांचिया कर्णरंध्रीं भरूनी मनोवृत्ति नादांत तल्लीन व्हाव्या||९||

टाळ्यांचिया गर्जनांनीं जनांनी मनानें मला माउली बोलवावें
 मी ना म्हणें ते न ऐकून त्यांनीं म्हणाहो, म्हणूनी म्हणावें

या आग्रहानें उभां राहतां मी झरु मन्मुखीं दे तुझी गोड वाणी
सत्कार माझा तुझ्या पाद पद्मीं समर्पून मी आपणा धन्य मानी||१०||

पृष्ठ क्रमांक १४४

जवळ जे असे
 सर्व देत असे
खर्च कर हवा तसा
कर हवें तसें
दक्षिणा जरी
 कधि मिळे तरी
एक पै (दिडकि)हि मी न ठेवि
ऐक तर खरी

पृष्ठ क्रमांक १४५
कोणी म्हणूं नये मज न कांहि ये..

अपूर्ण..

पृष्ठ क्रमांक १४६

दीपमाला

(मुलें बाळें)

थकूनि येऊनी
पसरलो मनी
दीर्घ यामिनी
...
अपूर्ण....

पृष्ठ क्रमांक १४७

# सदाफुली

किती निलाजरी
सदाफुली परी
सतत हंसत फिरत
पोर गोड गोड गोजिरी
दंव पडो किती
उन्हाचि ना भिती
हंसत डुलत दिसत
बाळवेलिच्या परी
स्वैर झुळुकशी
वाजवी शिटी
कुहू कुहू करीत गोड
कोकिलेपरी
म्हणा परी न
तरी
द्वाड कारटी
फार कोडगी
कांहिही म्हणा
परी न कांहि तिज तरी

पृष्ठ क्रमांक १४८

# आनंदाची वाट

आला पहा तो अग डाक वाला
आनंद* घेऊन खरं काय आला
'आनंद आला' म्हणतात बाला

आला पाहतो
पेटीत टाकी कुणि पाकिटाला
आला चला ग बघुं डाक वाला
आनंद आला म्हणतात बाला
आनंदि आनंद घरांत झाला
हिसकुनि पुडकें कुणि घे करीं
चिमुकले कर कोणि (दोन्हि) करी वरी

दडदडा दुरुनी कुणी धावती
(चढवून भिंवया कुणि पाहती)
तृषित लोचन ताणुनि पाहती
टकमका कुणि येऊनि पाहती||२||

'बघु बघूं 'म्हणती कुणि दे मला
गुरगुडरे कुणि मानसि आकुला
बरं बरें!! म्हणति कुणि ताठुनी||३||

पुटपुटे कुणि देइन वाचुंनी
तळमळे कुणि ना कळ सोसवे
जगिं कुणास म्हणा न नवें हवे!!
जबर जो जगिं तो मिळवी पदा

नशिबिं हो गरिबासच आपदा
तों पाळण्यांतुनि निघे अति तार परमोच्च सूर
ज्यानें द्रवेल मन फार कसेंहि क्रूर
ऐकून तो वळती सर्व लहान डोळे
आनंद दे,न रडवी तिज माय बोले ||५||

पृष्ठ क्रमांक १४९

आहे कोण जगात ज्यास न रुचे
(मुक्त जनहि..)
आनंद ज्या नावडे
आनंद केंद्रित दिसे मग पाळण्यांत
आनंद केंद्र विलसे मग पाळण्यांत
साऱ्या उभ्या शिशु सभोवति मंडळांत
ठेवून पाय अडवा धुडग्यावरी ती
आनंद ऐटिंत पहात पडे सप्रीती ||६||
पानांस वाचित ती किति पटाइत चाळण्यांत
सारें क्षणांतच भराभर वाचण्यांत
जीजी कडे वळुन बोलत बाळ गोड
आनंद वाचुन ग देइन थांब थोडं' ||७||

टीप: *आनंद' हे मराठीतील अत्यंत लोकप्रिय बाल मासिक (Periodical) आहे.सुरुवात: या मासिकाची सुरुवात १९०६ मध्ये वामन गोपाळ आपटे (वा.गो. आपटे) यांनी केली.उद्दिष्ट: हे मासिक प्रामुख्याने लहान मुलांसाठी सुरू करण्यात आले होते. यात मुलांसाठी बोधकथा, विज्ञानविषयक माहिती, कोडी आणि प्रेरणादायी लेख असतात.ऐतिहासिक महत्त्व: या मासिकाला लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्या थोर व्यक्तींचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन लाभले होते.

# रेझर पॉयझनिंग (धारदूषित वस्तरा)

२०.१२.१९३४
(मिश्र -
कायदा)
वस्तऱ्या खरां तू करामती
 तीक्ष्ण गति तुझी धन्य तवकृती
 सर्व केश रान हे सहज काढिले
गुळगुळीत गाल जाहले ||१||

(विकसलें /वदन खुळविलें रम्य जाहले)

बघुनि तोंड हे आरशांत मी
मुदित मानसें मी तुला नमी
पाहिले पुढे पुरळ पण उठे
 धैर्य ते (?) धावा मम किं रे सुटे ||२||

(उगवती दशा तारका नभीं)

हळुहळू जसे तारका गण
 व्यापिती नभो मंडळांगण
 पुसट पसरती ठळक चमकती
 प्रथम पुसटचे ठळक चमकती
 (ठळक होऊनी चमकू लागती)
उगवती किती नाहिं त्या मिती ||३||

 पुरळही वाढू लागले

वेढु लागले प्रांत आपले

(रात्र संपता सर्वलोपले
वदन वेदिती फोड वाढले
सकलमुखा कसे वेडू लागले
प्रौढ फोड ही वाढू लागले)
रात्र संपली तें न लोपलें
(एक-दोन की सांगते किती)
(दिवस रात्री ही वदन)
वदन गगन अकसे सर्व व्यापिले ||४||
पृष्ठ क्रमांक १५१
(दुःख)(कार्यक्षेत्र विशद)ते वाढू लागले

वाहिनी तुनी (नसांतुनी) दुःख वाढले (वाहिले)
(फो उठुनि गाठि ही कंठ व्यापती
एक दोन कां सांगु त्या किती ||५||

(उगवू लागले केसही पुन्हा)
करुनि कैकदा तोच तो गुन्हा
केश कोडगे प्रगटती पुन्हां
स्थान ज्यास जें जेथ लाभले
करति शिर तिथें उंच आपले ||६||

(स्फोटकामध्ये ते तिथे उभे)
स्फोटकामध्ये सभ्यसे उभे
कितितरी दबा धरुनि बैसती
वस्तऱ्या तुला तुच्छ लेखती
लोपली मुखीं सर्व चारुता

पसरली तिथे जटिल उग्रता ||७||

दावशी अता तूं कशी कला
धारदूषिता तव दिसे मला
केश कृष्णता वाटतें बरी
किरण तव नको कुटिल अंतरीं ||८||

विमल तूं मुखीं मलिन अंतरीं
मलिन राहिला तू निजांतरी
म्हणुनि वस्तऱ्या दुर्दशा तरी
पृष्ठ क्रमांक १५२
बाह्य चमकही व्यर्थ दिसत असे (न व असे)
म्हणुन संपलें पुण्यतव असे ||९||

घे बुडी अतां उकळत्या जळीं
झाड आपली सर्व काजळी (मळी)
स्नान निज तपें पूर्व वैभवा
मिळव हो सुखी सुखव तूं मम जिवा||१०||

मलिनता जिथें दाटु लागतें
कडु सदा तिथें गोड लागते
सकल तीक्ष्णता होय बोथट
सकल फुल्लता होय कोंदट ||११||

म्हणुनि शुद्धता मुख्य अंतरीं
सतत पाहिजे हे धरी उरीं
यापुढें तरी घे धडा असा

उमज वस्तऱ्या नीट तू कसा ||१२||

रे शब्द कीं पुरें शाहण्यास रे
म्हणुन एवढें आज तुज पुरें
सर्व जाहले विसरुं ये अतां
ये करीं अतां शीघ्र मागुल्या
२२.११.१९३३
उज्जैन

पृष्ठ क्रमांक १५३
Blank
पृष्ठ क्रमांक १५४

# नंदनवनिं चीं झाडें वेली

नंदनवनिं चीं झाडें वेली
 स्वर्गांतुनि ही आली
फुलें मुलें ही हंसती पसरति
 परिमल भवि भवीर भंवताली

 (स्वर्ग कुठेंतो ठाऊक नाहीं) वैकुंठ कोणचे
स्वर्ग कोणता जरि मज पुसतां

 अति सुख समृद्धिशाली
सुखी कुटुंबा घरि अवनी वरि उतरून आला खालीं

 स्वर्गाचें तें नांवच उरले
 पुराण निगमाभ्यासीं
 राही तो पति पत्नि शिशु
स्मित,कला विकास विलासीं
(पति पत्नीच्या बालकांच्या ही दडला तो उल्हास)

देव देवता (प्राशुनि अमृता) प्रेमामृत घोट पिउनी भूतलिं वसती
विविध कुंजवनिं नंदनवनिं या खेळांत रमती
हसत (लाभती)
पार नसे त्या सुखास पतिला जरि रमविति युवति सती
वाऱ्यापासुनि सांवरि सतिला वेलिस तरु कवटाळी
थकुनि भागुनि येउनि पथिकें येथ विसावा घ्यावा
(वितरत सुख)
प्रेमाच्या या वातावरणी स्वर्गिय मेवा खावा
किलबिल किलबिल शिशु रव ऐकुनि
पृष्ठ क्रमांक १५५

पडत सतत मी गळा
सतत मज लळा
काकांचा सांगू (लाड किती) किती फार आगळा

(रोज) रात्र हो किती | खाऊ आणिती
खाउ घातल्या विना न खांति, झोंपती
वर्ष पांचवें -|सरून साहवे
लागले असेल मज नसेल सातवें
एकदा असे| जाहले असे
बाहेरूनि येति घरीं| खिन्न मानसें
काय जाहले| खाउनि सरलें
वाटे वाईट बघुनि हात मोकळे
उचलून नी वरी| रोजच्या परी
घेती ना मला बघून |आइ घाबरी
काय जाहले| काय जाहले
ऑफिसांत आळ येत |चोरी जाहली...

अपूर्ण...

पृष्ठ क्रमांक १५६

जखडते बांधते जडा मना विचार श्रृंखला
 जखडु लागली| निसर्ग साखळी...
 कल्पना स्फुरे| आंत संचरे
काळोखा आंत जशी (चांदणी)ज्योति फुरफुरे...
अपूर्ण...

पृष्ठ क्रमांक १५७

वंदन तुझं राम तनय अवनी भास्कर
...
अपूर्ण..

पृष्ठ क्रमांक १५८

येई इथे बस खुशाल हवें तसें तूं
किं बोलगे
..

वाढे रोप,विशाल भव्य पसरे
झालें अहात झाड तें (झोंपडे महाल)
येथें हे

...
अपूर्ण..

पृष्ठ क्रमांक १५९

टीप: पृष्ठ क्रमांक १६२ वर पुनर्लेखन झाले आहे,त्या पूर्वी चे हे आराखडे असल्याने तेच वाचावे.

कविते ची रचना कित्येकदा सहजपणे होत असे तरी कवि मनांत अनेकदा अनेक विवंचना आणि चलविचल असते. त्याचा थारा वाचकांना उपलब्ध करण्यासाठी हे तसेच ठेवले आहे!
😨

# पाडवा (ड्राफ्ट)

परम मंगल हा दिन पाडवा
परत लौकर आज अवश्य या
म्हणत ती अति काकुळती करी
'सरळ यायचं हो बरं का घरीं'||१||

हुकुम हा सुटला पवनापरी
जलद मी घरिं ये जलदापरी
चिमुकल्या तनया मम चातकीं
सकल जगति वाट पहति कीं! ||२||

पाहून त्या मज दुरून मुली म्हणाल्या
'आले! चला!" म्हणत धांवत सर्व आल्या
माझ्याच त्या रूचिर कोरिंव लेखमाला
झाल्या (सभोंवती उभ्या झाल्या) उभ्या मज पुढे मम दीपमाला
डोळ्यांत ज्योति किरणांस विकास झाला ||३||

त्या (कीं)मूर्ति मंत मम सुंदर लेख(काव्य क्रमांक) माला
सद्भावना दाखविति ओळिंत दर्शिविति ये भरतें मन्मनाला
कीं तीं अहा रुचिर रेंखिव बाल लेणीं

जीं मीं अलंकृत करी मम हृत्कलेनी ||४||

(नीलांबरीं) नीलासनीं बसवुनी मज रामचंद्रा
साऱ्या सभोंवती उभ्या मग बाल तारा
मी मी करीन म्हणत्ये सगळ्यांत छोटी
तोंडी तिच्या चमकली किति हौस मोठी||५||

मद्भाग्य भूषण टिळा जणुं कुंकूवाचा
भालासि लाविति मुली मम अति मंजु वाच्या

त्या स्नेहपूर्ण तनया मम फूलवाती
निरांजनी तबकीं ठेउनि घेति हाती||६||

ओंवाळिती वरूनि वर्षति प्रेम दिव्य धारा
आला गमे उतरूनी घरिं स्वर्ग सारा
ओंवाळण्यांत बुबुळें भिंवया कमाना
कीं पालण्याहि फिरुं लागति गोल माना ||७||

काढिती इंदु कर तैज वर्तुळाला
तो भूषवी मन्मुखमंडलाला
कृष्णा प्रभा कमल ही साखळया क्रमाने.
ओंवाळि ती निज करें हंसऱ्या मुखाने ||८||

पृष्ठ क्रमांक १६०
वर्षा व होय मग मस्तकिं अक्षतांचा
 कीं शिंपल्या परि करांतुनि मौक्तिकांचा
ओंवाळणींत हृदयांतिल भावनांना
 गूंफून हार अर्पण करी कवि बालिकांना||९||
पृष्ठ क्रमांक १६१
 Blank
पृष्ठ क्रमांक १६२

# पाडवा

परम मंगल हा दिन पाडवा
 परत लौकर आज अवश्य या
 म्हणत ती अति काकुळती करीं
 सरळ यायचं हो बरं का घरीं||१||

 हुकुम हा सुटला पवानापरी
 जलद मी जलदापरि ये घरिं
चिमुकल्या तनया मम चातकीं
 सकळ जागति वाट पहाति कीं ||२||

पाहून त्या मज दूरून मुली म्हणाल्या
 'आले,चला!' म्हणत धांवत सर्व आल्या
 झाल्या उभ्या मज पुढें मम दीप- माला
 डोळयांत ज्योति किरणांस विकास झाला||३||

 त्या मूर्तीमंत मम काव्य क्रमांक माला
समद्भाव दाखविति ओळिंत मन्मनाला
(ओळीत त्या दिसती य भरते मनाला)

(रेखावी वाघमली जंगम बाल लेणी)
कीं तीं अहा रुचिर रेंखिव बाल लेणीं
जी मी अलंकृत करी मम हृत्कलेनी ||४||

निलांबरी बसवुनी मज रामचंद्रा
माझ्या त्या वेढिती मज जशा प्रतिभा कवींद्रा
(साऱ्या सभोंवति उभ्या मम बालतारा)
'मी, मी, करीन पहिले सगळ्यांत छोटी
बोले ;तिच्या चमकली मुखिं हौस मोठी||५||

मद्भाग्य भूषण टिळा जणुं कुंकुवाचा
भालासि लावीति मुली हसऱ्या मुखांच्या
स्नेहांतल्या चमकत्या मुलि फूलवाती
नीरांजनी तबकिं ठेउनि घेति हातीं||६||

ओवाळिती वरुनि वर्षति प्रेम धारा
आला गमे उतरुनी धरि स्वर्ग सारा
त्या मंडलाकृति मयें भिंवया कमाना
डोळे तसे फिरति डोलति गोलमाना ||७||

काढीति इंदु-कर तैजस वर्तुळाला
तें भूषवी वलय मन्मुखमंडलाला
कृष्णा प्रभा कमल ही सगळ्या क्रमानें
ओंवाळिते जननि ही मनिं त्या क्षणाला ||८||

करि अवक्षणाला
घेती सुपारी करिं त्या मृगशाऔवककाक्षी
(मानून तीस जणुं)साक्षात् जणूं जवळ मंगलमूर्ति साक्षी
त्या मांत्रिका परि शिरा वर मंडलांला
काढीति (बांधिती) गोल, टळण्यास इडापिडांला ||९||

वर्षाव होय मम मस्तकिं अक्षतांचा
कीं शिंपल्या परि करांतुनि मौक्तकांचा
ओवाळणींत कुरवाळुनि बालिकांना
गुंफूनी अर्पण करी कवि भावनांना ||१०||

पृष्ठ क्रमांक १६३

Pencil writing unreadable
केव्हांचा येथ उभा वाट बघतो
झाडीही किंर्र भिवविति पशु भिन्न भिन्न धैर्य मुळिं नसे गगनिं नयनांतरिं फांस उदरिं लपवितो
*दिंङ्गशिमुखिं तिमिर पटकन (सहज) झडप घालीतो

टीप: *दिंङ्गशिमुखिं तिमिर (संस्कृत) का अर्थ 'अंधकार' या 'अंधियारा' होता है। यह शब्द मुख्य रूप से दो भागों में बंटा है:दिंङ्गशिमुखि (दिशा/दसों दिशाएं) औरतिमिर (अंधकार)। इसका काव्यात्मक अर्थ 'दसों दिशाओं में छाया हुआ अंधकार' है।साहित्य और संस्कृति में इस शब्द का महत्व:पर्यायवाची: इसे 'तम', 'अंधियारा', या 'ध्वान्त' भी कहा जाता है।

पृष्ठ क्रमांक १६४

Blank
पृष्ठ क्रमांक १६५

# ज्योती मालवे

सोसाट्याचं वारा सुटलं
सुटला वारा मालवण्याला ज्योती
तेवत टिके हिं न ज्योती
कां जगत जाहले काळोखाचा साम्राज्य

का स्नेह रहित ही झाली देवा
गेली सगळी कांती
काळोखाचा साम्राज्य त्यांची
उडली सारी चमक जगाची
पसरे काजळीवरती
विजय पताका वरती फडके
काजळी पसरे हळूहळू वरती भयाणता
काळोखाचे मेघ दाटतो
विकट हास्य तो करिती
लाटा उसळती तुफान झाले
गगन ज्योती विझली
जणुं ज्योती गिळुनिते उदरांत लपली
विजय पथक फडफडती वरती
ज्योती विझविता गगनातील भयाणता जगिं पसरे

भयाण जगिं जणुं तळें आटलें
 जीवन आटें तळें वाळलें तळांत दिसली माती
काळवंडले मुख जणुं काजळ पसरे वदना भंवती
 डोळे भरले वळले वरती
 वळले ढग हळु द्रवले
जीवन घन द्रवले

फुटुं लागली पालवी खोडा
तळयांत जीवन भरले
बघूनी क्रूर ढग वर असले हे धडगत नच वाटे
 स्वतःकडे मी बघतां वाटे तळयांत जीवन आटे
 कांटेरी या झुडूपांने की धरुनी ओढला कोट अभेद्य

पृष्ठ क्रमांक १६६
१७.१०.१९३६ in the train for Maksi
ज्याला कांहि जबाबदारि न मुळी तो मंद भागी असे ज्याला बंधन कांहिही घरिं नसे चित्ती न चिंता वसे
अपूर्ण....

# बरं झालं, झालं लगीन ताईचं

(सारंगा)
बोबडी कविता , सुधारुन प्रस्तुत केली आहे.

बरं झालं झालं लगिन ताईच
किति मज मारुन मारुन घ्यायचं

चिडवुनि मज किति अपलं हंसायचं
मारुनि मजला उगिच हंसायचं
आपलं खाउनि माझं खायचं

वेडा वेडा वेडावुनि मज म्हटले वेडा
वेडा वेडा मज किति म्हटलें
कितितरि मजला 'ई' 'ई' करुनी
खरंच वाकुल्या* कितितरी दावुनि

मजला नेहमीं रडवुनि चिडवुनि मजला मारुनी
आपलं खाउनि माझं खायचं
रागे भरविन पिटविन
तुज मी नवऱ्याकडुनि रागें भरविन
पिटवीन रडविन
रडविन नवऱ्याकडून बघ मी
नवऱ्याकडून तिज चिडविन

राग़ें भरविन पिटविन रडविन
तिचि मी खोडकिं पुरती जिरविन
अतां घरीं तिज येउं न द्यायचं
तिच्याकडुन मज बोलति सगळे
गरीब अपला मी न च बोले
गरिबा सरखा मी नच बोले

तिच्याकडुन मजबोलति सगळे
मोठे मोठे करुनि डोळे
द्वाड कारटा मजसि म्हणायचं
नवऱ्या कडुन तिज मी चिडविन
रागें भरविन पिटविन रडविन
तिचि मी खोड किं पुरती जिरविन
आता घरीं तिज येउं न द्यायंचे

*वाकुल्या=चिडविण्या साठी तोंड वेडे वाकडं करुन बालसुलभ भाव भंगिमा करणें.

पृष्ठ क्रमांक १६८
(टीप: पृष्ठ क्रमांक १३१ वरील कविता सारखी असावी!)

कडकडून मग भेटी झाला
मामी मावशि काकी आल्या
आईचं तर काय पुसायचं
नयनाश्रूंना ओट्या भर ल्या

वरातीला मग बोळवणीला
वराडी मंडळ

जमलं,सुरू मनिं तुफान खळबळ
खळखळले मग अश्रू घळ घळ
कुणी कुणाला कसलं बघायचं

गाडी आली लागलि चालू
भरभर वर मग चढला बाळू
सरसर सरितां नयनीं चालू

---

जीजी बरोबर सासरिं जायचं
कमल सुकलिका विमला बाला
अर्पिली ही नवं भ्रमराला
तव चरणाला
प्रेमळतेची डोलती कलिका
स्वीकारावी प्रेमळ रसिका

---

कमल कांतीच्या विमल विकासे
पसरे परिमल अभिनव हासे
सरोवरापरी घर मम भासे
ये ये भ्रमरा खेळायाला

पृष्ठ क्रमांक १६९
Written in reverse order (Page 10 Reverse order)

पृष्ठ क्रमांक १७०
Written in reverse order (Page 09 Reverse order)

पृष्ठ क्रमांक १७१

Written in reverse order (Page 08 Reverse order)

पृष्ठ क्रमांक १७२

Written in reverse order (Page 07 Reverse

order)
पृष्ठ क्रमांक १७३
Written in reverse order (Page 06 Reverse order)
पृष्ठ क्रमांक १७४

Written in reverse order (Page 05 Reverse order)
पृष्ठ क्रमांक १७५
Written in reverse order (Page 04 Reverse order)
पृष्ठ क्रमांक १७६
Written in reverse order (Page 03 Reverse order)
पृष्ठ क्रमांक १७७
Written in reverse order (Page 02 Reverse order)
पृष्ठ क्रमांक १७८
Written in reverse order (Page 01 Reverse order)
Resequenced reverse order pages with proper continuity

Page 01 Reverse order (back cover inside)

गोकुळिचा कान्हा कोणी| पाहिला किं काय गं? गोकुळिचा राणा माझा देखिलां किं काय ग? (ध्रुवपद) जमुने चं पाणी सगळं| किती बाई काळं काळं
प्रभू चिंतनानं यमुना काळि पडलि काय ग ? ||१||
प्रभू सावळा हा कृष्ण |रंग तुझा झाला कृष्ण
कृष्ण नाथ लपवुनिं पोटीं| ठेविला किं काय ग?||२|| सांग गडे जमुना माई |संशयास जागा राही
ल
तूचि ऐसी केली बाई कारवाई काय ग ?||३||

etc

बहु असो तर सुंदर संपन्न कि महा |प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा (ध्रुवपद)
गगनभेदी गिरीविण आणुन न च जिथे उणे |आकांक्षा पुढति जिथे गगन ठेंगणे
अटकेवरी जेथली तुरंगि जल पिणे| तडे अडें काय जलाशय नदा विणे
मर्यादा पौरुषास जेथे दुःसहा ||१||

etc

फंसले इ बाई |सुख कपाळी माझ्या नाही ||ध्रुवपद||

लग्ना पासुनि सारखि कटकट 'प्रिये सुंदरी' अशि ही वटवट
अशी का कोठे असते तरि रित - लाजच नाही
||सुख ग ||१||

सदान् कदाची लिहीती गाणी. तीच तीच मज दाविति वाचूनी
आले धन्य तुझ्या का ध्यानी पुसती बाई
||सुख ||

अपरात्रीं ही दिवा ढणढणा
कण्हत घेती बेसुर ताना
असा उजगरा कशि ती येना. झोपच बाई||३||

रोज रोज हें गाणीं म्हणण्या

सांगुनि जाती आजि मी ये ना
आतुंर यांच्या कोण गायना.  न कळे काही ||४||

Page 02 Reverse order

दिव्य महेंद्रपदांऽऽना |अमराऽऽना अमराऽऽना| करी देवांगना| प्रेम करी गायनाऽऽऽ

अखंड यौवन सुधा सेवना |बिंबाधर मधुपाना| येइ देवांगना येई देवांगना

प्रेम करी गायना ऽऽ

जी असे माधुरी अमृता नत |असे सुरस परी गाना |करी देवांगना
येई देवांगना

प्रेम करी गायना ऽऽ

Page 03 Reverse order

# आखरी अनुरोध

(एक सोलह वर्ष की तरुणी एलएलबी का अभ्यास करने के लिए जाने वाले अपने पति को उद्देश कर मृत्युशय्या पर पडे पडे कह रही है)

अब जाकर शीघ्र आईये

क्षण एकैक अमूल्य आज से
फिर नाथ मिलूं मिलूं न वा
करिये जो कुछ योग्य जानिये॥१॥

पथ रोक खडी कभी प्रभो
न रहूंगी भवदीय कीर्ति का
छिपता मुख चंद्रमा जरा
करता...

Page 04 Reverse order
Blank
Page 05. Reverse order
Blank
Page 06. Reverse order

# सूर्यग्रहण

(२२ ऑगस्ट 1933)

विकट हास्य कर पश्चिम दिक् से. कौन बाली झांका
तेजो निधि को फैंक कपट. अंचल से ढांका
सहस्त्र कर,कर बांधे किसने. किसने विवश किया
किसने तेरा काला मुख कर. वैभव छीन लिया
सिंहासन है डगमग हिलता. शिरसे मुकुट पड़ा
भारत के दुर्भाग्य तिमिर में. भास्कर बिंब पड़ा
प्राची दिव सौभाग्य तिलक तू. उदयोन्मुख आया
त्यों ही भारत पाप पुंज की. फैली क्या छाया

(०८०० ग्रहण करीब करीब)
व्हाइट पेपर पर की मुख पर. स्याही क्या छाई

हृदय उदधि के मंथन से. विष श्यामलता आई
स्वयं प्रकाशी जगत केंद्र तुम. जगत्सहायक हो
भारतवासी कैसें होवैं. हाय सहाय कहो
गङ्गा यमुना चली हृदय से. अंजलि लो उसकी
अति नाद ये मंत्र चले हैं. धड़ धड़ वा उरकी
ऊंचे तुम हो गगन विहारी. नीची घोर घटा
आत्मतेजबल आप दिखावो कर. देओ ग्रहण हटा

Page 07. Reverse order

पहरे में रवि
रहा प्रहर भर कारागृह में. पाकर छुटकारा
शुभ मंगल किरनों से रवि है करता. भारत उजियारा

Page 08. Reverse order

सुकवि,काव्य कल्प नहीं सुना
सुकवि में हमने तुमको चुन
तृषित हैं सुनने कवि रामजी
कलम को अब दो न विराम जी
सुकवि जी कविता कहिये नई
दिन व्यथार्थ व्यतीत हुए कई
न सुनते कविता इस ढंग की
कुशलता जिसमें सबरंग की
नृपति भोज गये नृरप विक्रम
सुकवि के सब व्यर्थ परिश्रम
न महमूद रहे गजनी पति
रसिक आज न हैं अवनी पति
सुकवि का अब मान कहां रहा
समय और हि था अब और हा!
अब लगी नित कवि, पेट विवंचना

न घर में अब चांवल वा चना

Page 09. Reverse order

तौ मी आज..

गंगा में सरिता स्वभेद रहिता. पातीं यथा एकता
पा स्रोत प्रवाह एक रसता. खो आत्मता बैठता
वैसी है रसिकांतरंगरसता. एकत्रिता आज है
एवं है जनता अति प्रमुदितां. सौभाग्य काल है

Page 10. Reverse order

# आखरी अनुरोध

(एक सोलह वर्ष की तरुणी एलएलबी का अभ्यास करने के लिए जाने वाले अपने पति को उद्देश कर मृत्युशय्या पर पडे पडे कह रही है)

अब जाकर शीघ्र आइये
क्षण एकैक अमूल्य आजसे
फिर नाथ मिलूं मिलूं न वा
करिए जो कुछ योग्य जानिए ||१||
पथ रोक कभी खड़ी प्रभो

न रहूंगी भवदीय कीर्ति का
छिपता मुख चंद्रमा जरा
करता व्याकुल किन्तु है मुझे ||२||

यह है स्थिति नित्य चित्त की

गति जाने भगवान् भविष्य की
अति संनिध है तरङ्ग की
लय आत्यन्तिक अब्धि वारि में
बुझती यह ज्योति आज है